रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३०६
www.ramprahar.com

गुरुवार, २५ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

कर्जतमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे जमिनीची विक्री/२
चौकच्या वाकी नदीपात्रातील अतिक्रमणावर कारवाई/५
जेपीपीएलमध्ये एफएससीसी, रॉकविला फायटर्स विजयी/८

## मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या समुद्री पुलाची मुख्य भूमीशी जोडणी

**मुंबई** : मुंबई पारबंदर अर्थात एमटीएचएल प्रकल्प आर्थिक भरभराट आणणारा ठरेल. हा तिसऱ्या मुंबईची सामाजिक-आर्थिक परिस्थिती पालटून टाकणारा गेम चेंजर करेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. २४) येथे व्यक्त केला, तर महाराष्ट्राच्या ट्रिलियन डॉलर इकॉनॉमीचा मार्ग या प्रकल्पावरून जाईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुंबई पारबंदर प्रकल्पांतर्गत महत्त्वाकांक्षी समुद्री पुलाची मुख्य भूमीशी प्रत्यक्ष जोडणी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. या प्रकल्पाचे लोकार्पण प्रकल्पाचे भूमिपूजन करणारे आणि पुढे हा प्रकल्प पूर्णत्वास जावा यासाठी सर्वतोपरी पाठबळ देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येईल, असे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी सांगितले.



## काविळ झाल्यासारखे वागणे बरोबर नाही

### उपमुख्यमंत्री फडणवीसांचा विरोधकांना टोला



**मुंबई : प्रतिनिधी**

नव्या संसद भवनाचे उद्घाटन २८ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे, मात्र या उद्घाटन सोहळ्यावर विरोधकांनी बहिष्कार घातला आहे. यावरून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा समाचार घेत काविळ झाल्यासारखे वागणे बरोबर नाही, असा टोला प्रसारमाध्यमांशी बोलताना लगावला आहे.

नवीन संसद भवन ही देशाची शान आहे. कमी वेळात व भव्यतेने हे संसद भवन तयार झाले असून जगासमोर भारताची ताकद आली आहे, मात्र मोदीजींना विरोध करण्याचा ज्यांना ज्वर चढला आहे असे लोक लोकशाहीच्या मंदिराच्या उद्घाटनालाही जात नाहीत. ते कारणे सांगत आहेत ती हास्यास्पद आहेत. यापूर्वी १९७५मध्ये लोकसभेच्या एनएक्स इमारतीचे उद्घाटन स्व. इंदिराजींनी केले होते. मग ते लोकशाही विरोधी होते का? यापूर्वी संसदेची जी भव्य लायब्ररी आहे त्याचे भूमिपूजन स्व. राजीव गांधींनी केले होते. तेही लोकशाहीविरोधी होते का, असा सवाल उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थित केला.

मूळात यांचा प्रश्न एवढाच आहे की वर्षानुवर्षे नवीन संसद भवन व्हायची चर्चा व्हायची, पण कुणी बनवू शकले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ते संसद भवन बनवून दाखवले. त्यामुळे कुठेतरी पोटात दुखतंय. विरोधी पक्षांनी जो निर्णय घेतला आहे त्यावरून हेच दिसते की त्यांचा लोकशाहीवर विश्वास नाही, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### भाजपला पराभूत करण्याचा प्रयत्न यशस्वी होणार नाही

दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या भेटीवर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले की, भाजपला पराभूत करण्यासाठी अरविंद केजरीवाल कुणाही सोबत जायला तयार आहेत. उद्धव ठाकरे हे कुणाही सोबत बसायला तयार आहेत. यावरूनच भाजपची ताकद किती आहे त्यांना समजले आहे. २०१९मध्येही असा प्रयोग त्यांनी करून झाला आहे. विविध विधानसभांमध्येही हा प्रयोग करण्यात आला आहे, मात्र असा प्रयोग तेव्हाही यशस्वी झाला नाही आणि आताही यशस्वी होणार नाही.

### राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक

# शेतकऱ्यांना दर्जेदार बी-बियाणे, खते द्या

## मुख्यमंत्र्यांचे कृषी विभागाला निर्देश




**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासन शेतकऱ्यांप्रती संवेदनशील आहे. आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करतानाच शेतकऱ्यांना दर्जेदार बी-बियाणे, खते मिळण्यासाठी कृषी विभागाने दक्ष राहावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. २४) येथे दिले.

राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीचे आयोजन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री शिंदे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषीमंत्री अब्दुल सत्तार, पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील, रोजगार हमी व फलोत्पादनमंत्री संदिपान भुमरे, बंदरे व खनिकर्ममंत्री दादाजी भुसे, कामगारमंत्री डॉ. सुरेश खाडे, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, सहकारमंत्री अतुल सावे, आमदार प्रकाश आबिटकर, मुख्य सचिव मनोज सौनिक, सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषी आयुक्त सुनील चव्हाण आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मागील काही दिवसांत अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. त्या वेळी प्रत्यक्ष शेतात जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधता आला. त्यांच्या अडचणी समजून घेत त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. आगामी खरीप हंगामाची उत्तम पूर्वतयारी झाली आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. कृषी विभागाने गुणवत्ता नियंत्रण पथके, भरारी पथके कार्यान्वित करावीत. लिंकेजच्या तक्रारी आल्या, तर तातडीने कारवाई करावी. शेतकऱ्यांसाठी पुरेसे बी-बियाणे, खतांचा साठा उपलब्ध असून ते वेळेत मिळतील अशी दक्षता कृषी विभागाने घ्यावी. यंदाच्या मॉन्सूनवर एल-निनोचा प्रभाव होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी पेरण्यांची घाई करू नये. पुरेसा पाऊस आणि जमिनीत ओल पाहूनच शेतकऱ्यांनी पेरण्यांचा निर्णय घ्यावा. त्यासाठी कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठांनी शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करावे. राज्य शासनाच्या माध्यमातून पुरविण्यात येणारे बियाणे दर्जेदार असावे. त्याचीही आपण प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी करणार आहोत असे सांगून शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्जाचा पुरवठा करावा. बँकांनी यासाठी पुढाकार घ्यावा, अशी सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

> **भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार यंदाच्या वर्षी सरासरीच्या ९६ टक्के पाऊस अपेक्षित आहे. राज्यात सन २०२२-२३मध्ये धान्य पिकाचे १७२.४९ लाख टन उत्पादन अपेक्षित आहे. खरीप हंगामात लागवडीखालील अपेक्षित क्षेत्र ५८.२८ लाख हेक्टर राहणार आहे.**
> **-अब्दुल सत्तार, कृषीमंत्री**

अवकाळी पाऊस, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी सन्मान योजना सुरू करण्यात आली आहे. जलयुक्त शिवार योजनेची भूजल पातळी उंचावण्यास मदतच झाली आहे. शेतकऱ्यांनीही पारंपरिक शेतीबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा. शेतीपूरक व्यवसाय, कृषी पर्यटनावर भर द्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, यंदाच्या पावसाळ्यावर एल-निनोचा प्रभाव असल्याचे सांगण्यात येत आहे, परंतु अन्य दोन घटक पावसाला अनुकूल आहेत. त्यानंतरही पावसाने ओढ दिली, तर कृषी विद्यापीठांनी पेरण्यांचे वेळापत्रक निश्चित करावे. त्याविषयी शेतकऱ्यांमध्ये कृषी विभागाने जनजागृती करावी. जिल्हा प्रशासनाने पीक कर्ज वितरणाचा नियमितपणे आढावा घ्यावा. पावसाळा सुरू होईपर्यंत तलावातील गाळ काढणे, बांधबंदिस्ती, जलयुक्त शिवारच्या कामांना गती द्यावी. हवामान केंद्र अद्ययावत करावीत. ऊर्जा विभागाने जोडण्यांची संख्या वाढवावी. याशिवाय मुख्यमंत्री सौरऊर्जा विभागाला सर्व विभागांनी सहकार्य करावे.

राज्यातील कृषी क्षेत्राच्या दृष्टीने खरीप हंगामास अनन्यसाधारण महत्त्व आहे. कृषी क्षेत्राच्या सूक्ष्म नियोजनाच्या दृष्टीने राज्यात सर्वत्र खरीप हंगामपूर्व आढावा बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. कृषी विभागाच्या माध्यमातून विविध योजनांची अंमलबजावणी सुरू असल्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी सांगितले.

या वेळी सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, कृषी विभागाचे प्रधान सचिव श्री. डवले, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, राहुरी येथील महात्मा जोतिराव फुले कृषी विद्यापीठचे कुलगुरू डॉ. प्रदीपकुमार पाटील, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत, भारतीय हवामान विभागाचे पुणे येथील प्रमुख श्री. होसाळीकर आदींनी आपापल्या विभागाचे सादरीकरण केले.

### बळीराजाला नाडणाऱ्यांवर कडक कारवाई करा -उपमुख्यमंत्री

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बोगस बियाणे, खते विक्रेत्यांविरुद्ध कडक कारवाई करावी. वेळप्रसंगी त्यांचे परवाने रद्द करावेत. शेतकऱ्यांची कृषी कर्जासाठी अडवणूक करणाऱ्यांविरुद्ध प्रथम माहिती अहवाल दाखल करावा व पीक कर्ज वितरणाला गती द्यावी. पुढे बोलताना त्यांनी आगामी काळात पिकांचे पंचनामे करताना मानवी हस्तक्षेप टाळून तो ई-पीक पाहणीच्या माध्यमातूनच झाला पाहिजे, असे निर्देश दिले.

## निवडक

### पुण्यात आयपीएलवर सट्टा; पबमालकासह चौघांना अटक

**पुणे** : कोंढवा भागातील एका इमारतीत आयपीएलवर सट्टा लावणाऱ्या तीन जणांना पुणे पोलिसांनी अटक करून रोख रक्कम व साहित्य जप्त केले आहे. वसीम हनीफ शेख, इक्रमा मकसुद मुल्ला, मुसाबित मेहमुद बाशाइब अशी आरोपींची नावे आहेत. याशिवाय पुण्यातील एक प्रसिद्ध पब मालक जितेश मेहता यालादेखील अटक करण्यात आली आहे. तो या सट्ट्यातील मुख्य बुकी अक्षय तिवारीच्या (मध्य प्रदेश) संपर्कात होता. अक्षयवरही गुन्हा दाखल झाला आहे.

### देशातील सहा राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज

**नवी दिल्ली** : उत्तर भारतासह देशभराच्या बहुतांश भागातील उष्णतेची लाट ओसरू लागली आहे. यासह सहा राज्यांत वादळी वाऱ्यासह पाऊस व गारपिटीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाने राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि चंदीगड या राज्यांमध्ये यलो अलर्ट जारी केला आहे.

## राहुल गांधींसह काँग्रेसचा निषेध

### अलिबागेत भाजप युवा मोर्चाचे जोडे मारो आंदोलन

**अलिबाग : प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची छत्रपती शिवाजी महाराजांशी तुलना करणाऱ्या काँग्रेस पक्षाचा व राहुल गांधी यांचा अलिबाग तालुका भाजप युवा मोर्चातर्फे बुधवारी (दि. २४) निषेध करण्यात आला. भाजपने अलिबाग शहरात राहुल गांधी यांच्या पुतळ्याला जोडे मारून निषेध आंदोलन केले.



(छाया : जितू शिगवण)

काँग्रेस पक्षाच्या अधिकृत ट्विटर हँडलवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी करणारा व्हिडीओ पोस्ट करण्यात आला आहे. त्याच्या निषेधार्थ भारतीय जनता युवा मोर्चातर्फे अलिबाग येथे जोडे मारो आंदोलन करण्यात आले. या वेळी संतप्त कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

भाजप युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस निखिल चव्हाण, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजेश मपारा, युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष अमित घाग, भाजप अलिबाग उपाध्यक्ष राजेश पाटील, ओबीसी सेल तालुका अध्यक्ष अशोक वारगे, महिला मोर्चाच्या जान्हवी पारेख, सोशल मीडिया प्रमुख अंजारा आदी पदाधिकारी, कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते.

## पनवेल मनपा हद्दीत विद्रुपीकरण करणाऱ्यांवर होणार कडक कारवाई!

### अनधिकृत बॅनरबाजी करणाऱ्यांना महापालिकेने बजावल्या नोटीस

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका हद्दीत अनधिकृतपणे बॅनर, होर्डिंग्ज व भिंतीपत्रके लावणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा पवित्रा महापालिकेने घेतला असून अनधिकृतपणे बॅनर लावणाऱ्यांवर नोटीस बजावण्यात आल्या आहेत तसेच फौजदारी कारवाईसाठी मालमत्ता विद्रुपीकरण कायदा १९९५ व मुंबई उच्च न्यायालयाच्या कायद्यानुसार एफआयआर दाखल करण्यात आले आहेत.

पनवेल महानगरपालिका हद्दीत महापालिकेची कोणत्याही प्रकारची पूर्वपरवानगी न घेता अनेक भिंतीपत्रके व बॅनर लागल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामध्ये प्रहार अकॅडमी, सिटी बाईक्स पॉईंट, कमांडो करिअर अकॅडमी, परी. स्कूल (किड्स क्लब), मातोश्री हॉस्पिटल आदी व्यावसायिक संस्थांचा सहभाग आहे.




मालमत्ता विद्रुपीकरण कायदा १९९५ व मुंबई उच्च न्यायालयाच्या २६ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या आदेशान्वये स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेवर अथवा विद्युत पोलवर पूर्वपरवानगी न घेता बॅनर्स, पोस्टर्स, फलक, डिजिटल फ्लेक्स, कमानी इत्यादी जाहिराती करू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत तसेच या कायद्यात अशा अनधिकृतपणे जाहिरात करणाऱ्यावर संस्थाचालकांवर फौजदारी कारवाई करण्याची तरतूद आहे. असे असतानाही काही व्यावसायिक संस्थांनी नियमांचे उल्लंघन करून आपल्या व्यावसायिक प्रसिद्धीसाठी अनधिकृतपणे बॅनरबाजी केली आहे. **(पान २ वर..)**

> **महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे बॅनरबाजी करणे नियमबाह्य असल्याने अशा व्यावसायिकांवर नियमानुसार दंडात्मक व फौजदारी कारवाई केली जात आहे. व्यवसायाच्या दृष्टिकोनातून ज्या व्यावसायिकांना प्रसिद्धी करायची आहे त्यांनी अधिकृतपणे महापालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे.**
> **-रोशन माळी, प्रभाग ड अधिकारी, पनवेल महानगरपालिका**

## सुकापूरमध्ये हर घर नल हर घर जल योजना

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे पाली देवद (सुकापूर) ग्रामपंचायत हद्दीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जल जीवन मिशन अंतर्गत हर घर नल हर घर जल योजना राबविण्यात येत आहे. त्याचे भूमिपूजन भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि. २४) झाले.

हर घर नल हर घर जल योजनेंतर्गत सुकापूर ग्रामपंचायत हद्दीत नवीन पिण्याच्या पाण्याची टाकी व नळ पाणीपुरवठा या कामांचा समावेश आहे. यासाठी एक कोटी ९० लाख ४३ हजार २६७ रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या कामाचे भूमिपूजन छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा मैदान येथे झाले.

या कार्यक्रमास भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, माजी पंचायत समिती माजी सदस्य भूपेंद्र पाटील, सरपंच योगिता पाटील, उपसरपंच दिव्येश भगत, सदस्य महेश पाटील, पुष्पा म्हसकर, माजी उपसरपंच बुवाशेठ भगत, आलुराम केणी, भाजप पाली देवद सरचिटणीस उदय म्हसकर, सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, आनंद म्हसकर, प्रकाश म्हसकर, पांडुरंग म्हसकर, बाळकृष्ण पाटील, भरत म्हसकर, सत्यवान काकडे, वासुदेव पाटील, नारायण पाटील, सुरेश मुकादम, रवींद्र केणी, जनार्दन म्हसकर, पांढरी ठाकूर, श्रीनाथ भोपी, गुड्डू पोपेटा, प्रभाकर म्हात्रे, प्रशांत गांगुर्डे, निलेश पोपेटा, अनिकेत कसाळ यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## बारावीच्या परीक्षेचा आज निकाल

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल गुरुवारी (दि. २५) जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना हा निकाल दुपारी २ वाजल्यापासून ऑनलाईन पाहता येणार आहे.

कोरोनानंतर पहिल्यांदाच बारावीची परीक्षा पूर्वीप्रमाणे घेण्यात आली तसेच यंदा कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले. त्यामुळे कॉपी प्रकरणांमध्ये मोठी घट झाल्याचे पहायला मिळाले. परीक्षेनंतर शिक्षकांनी मुदतीत उत्तरपत्रिकांची तपासणी केली आहे. mahresult.nic.in, https://hsc.mahresults.org.in, http://hscresult.mkcl.org या संकेतस्थळांवर निकाल पाहता येणार आहे.

बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर २६ मेपासून ५ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना गुण पडताळणीसाठी संकेतस्थळावर अर्ज करता येईल, तर गुणपत्रिका ५ जून रोजी महाविद्यालयात मिळणार आहे.

## गोवंश जनावरांची कत्तल करणाऱ्या आरोपींच्या मुसक्या आवळल्या

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वावर्ले गावच्या हद्दीत गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करणाऱ्या आरोपींना खालापूर पोलिसांनी शिताफीने पकडले आहे.

### खालापूर पोलिसांची कारवाई

वावर्ले हद्दीत गाईंची कत्तल करून मांस आरोपी विक्रीसाठी घेऊन गेले होते. हे ठिकाण झाडाझुडपांनी व्यापले आहे. तेथे सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने मांस कोणत्या ठिकाणी विक्रीस नेले याबाबत माहिती मिळणे अवघड होते. अतिशय सावधपणे शोध घेतल्यावर गाडीची माहिती मिळाली. या गाडीचा मालक नाशिक जिल्ह्यातील असल्याचे समजले. त्यानुसार पोलीस पथक नाशिक येथे गेले असता ती गाडी सात लोकांना विकली असून शेवटची विक्री ओएलएसक्स या ॲपवरून मुंबई येथून झाल्याचे समोर आले.

खालापूर पोलिसांनी मुंबई गाठली आणि एका मोबाईल नंबरवरून आरोपी व गाडी शोधली. आरोपींमध्ये फरहान हनीफ बुबेरे, कलाम कुरेशी (दोघेही रा. कौसा, मुंब्रा-ठाणे), आसिफ अब्दुल कुरेशी, जाफर अन्वर शेख, अयाज उर्फ महाराज कामत्री (तिघेही रा. कुरेशीनगर, कुर्ला-मुंबई) यांचा समावेश असून एकाला ताब्यात घेतले, तर दोन आरोपींनी पनवेल पोलिसांनी त्यांच्या हद्दीतील आरोपात अटक केली आहे. दोन फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

दरम्यान, यापुढे असे गुन्हे घडू नये म्हणून पोलिसांकडून गाव पाटील, स्थानिक गोरक्षक व ग्रामस्थांच्या मदतीने नाकाबंदी करून संशयित गाड्यांची तपासणी करण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी जनावरे गोठ्यात, छावणीत बांधून ठेवावी, गाव पातळीवर ग्रामपंचायतींनी कोंडवाडे तयार करावेत, गोधन रक्षणकर्त्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन खालापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक बाळा कुंभार यांनी केले आहे.

# कुशल मनुष्यबळासाठी टास्क फोर्स कार्यान्वित करा

## कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक दर्जाच्या रोजगार संधी उपलब्ध होण्यासाठी कौशल्य विभाग आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये बदल करत असून, राज्यात वरिष्ठ अधिकारी यांचा टास्क फोर्स लवकर कार्यान्वित करावा, असे निर्देश कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिले. यासाठी लागणारे सर्व सहकार्य शिक्षण विभागाकडून केले जाईल, अशी ग्वाही शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली.



शालेय शिक्षणमंत्री केसरकर यांच्या दालनात झालेल्या बैठकीत मंत्री लोढा बोलत होते. या वेळी शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालक दिगंबर दळवी यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री लोढा म्हणाले की, जागतिक दर्जाच्या शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. देश-विदेशातील राज्यांमध्ये एकमेकांत संवाद असणे गरजेचे आहे. आपल्या कौशल्य विकास शिक्षणात परदेशातील मागणी लक्षात घेता तसे बदल करता येतील. त्यासाठी शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचेही सहकार्य आवश्यक आहे, त्यांनी सांगितले.

बाडेन-वूर्टमवर्ग आणि महाराष्ट्र या दोन्ही राज्यांमध्ये तातडीने कृतीदल सुरू करुन कौशल्यविकास, पर्यटन, शिक्षण, सांस्कृतिक देवाण-घेवाण याबाबतचे सामंजस्य करार करण्याबाबत निश्चित झाले. त्यातून मराठी तरुणांना नोकरीची संधी मिळेल आणि जर्मनीतील मनुष्यबळाची कमतरता दूर होईल. याबाबत मंत्री केसरकर म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे कौशल्य विकासाबाबत विशेष आग्रही आहेत. त्यांच्या पुढाकाराने हे धोरण आखण्यात आले आहे. त्यात महाराष्ट्र अग्रेसर राहिल. केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत व्यावसायिक, तांत्रिक प्रशिक्षण आणि परदेशी भाषांचे शिक्षण प्राथमिक वर्गापासूनच उपलब्ध करण्यात आले आहे, असेही मंत्री केसरकर म्हणाले.

**महाराष्ट्रात मिळणार जर्मनीतील आवश्यक कौशल्याचे शिक्षण**

जर्मनीतील सर्वांत प्रगत बाडेन-वूटॅमबर्ग या राज्यात विविध उद्योगधंद्याना जाणवणारी मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता महाराष्ट्रातील शिक्षण संस्थांमध्ये जर्मनीतील आवश्यक कौशल्याची भर घातली जाईल. त्यात नवे तंत्रज्ञान व जर्मन भाषेच्या शिक्षणाचा समावेश असेल. त्यासाठी दोन्ही राज्यांच्या सरकारच्या नियंत्रणाखाली दोन सरकारमध्ये किंवा उद्योगांमध्ये करार केले जातील, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी या वेळी दिली.

## शिष्यवृत्तीची रक्कम लवकरच विद्यार्थ्यांच्या खात्यात होणार जमा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२२-२३ या वर्षासाठीची पहिल्या टप्प्यातील शिष्यवृत्तीची रक्कम लवकरच विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे, अशी माहिती उपायुक्त श्रीराम पवार यांनी दिली.

पहिल्या टप्प्यात १७ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज संमत झाले असून यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्यासाठी अनुमाने एकूण १५ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने राबवण्यात आलेल्या शैक्षणिक शिष्यवृत्ती योजनेसाठी ७१ हजार ३१५ अर्ज प्राप्त झाले होते. मार्च अखेर २०२१-२२ या वर्षाची शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँकेच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे. या वर्षासाठी ३४ हजार १५० विद्यार्थ्यांचे अर्ज आले होते. त्यापैकी मार्चअखेर २० हजार विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यासाठी १६ कोटी रुपये खर्च आला. या वर्षाच्या उर्वरित पात्र दोन हजार ४०० विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यासाठी दोन कोटी रुपये खर्च होणार आहे.

२०२२-२३ या वर्षासाठी ३७ हजार १६५ अर्ज प्राप्त झाले आहेत. या वर्षासाठी पहिल्या टप्प्यात १७ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज संमत झाले आहेत.

# खोट्या कागदपत्रांच्या आधारे जमीन विक्री

## कर्जतमध्ये पाच जण ताब्यात; एक आरोपी फरार

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील माले गावी असलेल्या जमिनीचे खोटे कागदपत्र तयार करून व बोगस व्यक्ती उभे करून जमिन विक्री केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नेरळ पोलिसांनी पाच आरोपींना ताब्यात घेतले, तर एक आरोपी फरार झाला आहे.

मुंबई येथील मोहिनी दीपक छाब्रिया यांनी साळोखतर्फे वरेडी हद्दीमधील माले येथील जमीन तुफेल अहमद शेख व इम्रान तुफेल शेख यांच्याकडून सन २००७मध्ये विकत घेतली होती, मात्र जमिनीचा सातबारा त्यांच्या नावे झाला नव्हता. याच गोष्टीचा गैरफायदा घेऊन सचिन वामन शेळके (रा. माझगाव मुंबई), भरतकुमार वालचंद जैन (रा. विरार), चिंतामण नारायण बदे (रा. कळंब कर्जत), दिनेश रामचंद्र शेवाळे (रा. भांडूप) तसेच संदेश धोंडू टेंभे (रा. नवगाव कल्याण) आणि वाजीद जुवारी (रा. साळोख कर्जत) यांनी तुफेल अहमद शेख व इम्रान तुफेल शेख यांच्या नावाचे खोटे पॅन कार्ड व आधार कार्ड बनवून आरोपी संदेश धोंडू टेंभे याचे नावे खरेदी खताने करून दिली होती.

मोहिनी दिपक छाब्रिया यांनी सातबारा आपले नावे होण्याकरीता २० फेब्रुवारी २०२३रोजी तहसिलदारांकडे अर्ज केला. तेव्हा त्यांना या बोगस खरेदी खताची माहिती मिळाली. मोहिनी छाब्रिया यांचे कुलअखत्यारीत तलत अब्बास सयेद यांनी नेरळ पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली. यामध्ये पाच आरोपींना नेरळ पोलिसांनी अटक केली आहे. दोन आरोपी न्यायालयीन कोठडीत असून बाकी तीन आरोपींना जामिन मिळाल्याने त्यांची सुटका करण्यात आली आहे, तसेच आरोपी वाजीद जुवारी हा फरार आहे. पुढील गुन्ह्याचा अधिक तपास नेरळ पोलीस करीत आहेत. या जमीन खरेदी घोटाळ्यात खरेदीदाराची ४७ लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक झाल्याचे समजते.

# पालीत मान्सूनपूर्व नालेसफाईला सुरुवात



**सुधागड : रामप्रहर वृत्त**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीमध्ये नगरपंचायततर्फे नालेसफाईला सुरुवात झाली आहे. यामुळे पावसाळ्यात गटारे व नाले तुंबण्याचा धोका नसल्याने नागरिकांनीही समाधान व्यक्त केले आहे.

पाणी बॉटल, प्लॅस्टिकच्या पिशव्या, घरगुती कचरा व गाळ यामुळे ठिकठिकाणी नाले व गटारे तुंबली होती. या तुंबलेल्या गटारांमुळे सर्वत्र घाण आणि दुर्गंधी पसरली होती, मात्र नालेसफाई सुरुवात झाल्याने या सर्व समस्या काही दिवसांत मार्गी लागणार आहेत.

नगरपंचायतीद्वतर्फे कंत्राटी कामगार घेऊन नालेसफाई केली जात आहे. जेसीबी, ट्रॅक्टर व पारंपरिक साधने आदी साधनांचा वापर करून गटारे व नाल्यातील घाण, कचरा काढला जात आहे. याबरोबरच गटारे व नाल्याभोवती उगवलेले गवत, झाडेझुडपेदेखील काढली जात आहेत.

**मे अखेर किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण नगरपंचायत हद्दीतील नालेसफाईची कामे पूर्ण होतील. नालेसफाईची कामे चांगली व वेळेत व्हावीत यासाठी स्वतः लक्ष देत आहे. तसेच स्वच्छता सभापती व नगरसेवक देखील या कामांवर लक्ष ठेऊन आहेत. नागरिकांनी आवाहन आहे की, त्यांनी प्लास्टिक बॉटल, पिशव्या व घरातील कचरा गटारे किंवा नाल्यात टाकू नये.**

**-प्रणाली शेळके,**
**नगराध्यक्ष, पाली नगरपंचायत**

# मोकाट गुरांपासून बचावासाठी झाडांच्या सभोवताली कुंपण



**खोपोली : प्रतिनिधी**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून तसेच डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन वर्षांपूर्वी शेडवली येथे वनविभागाच्या जागेत हजारो वृक्ष लागवड करण्यात आली होती. आज हे वृक्ष उभे राहिले आहेत. या वृक्षांचे मोकाट गुरांपासून संरक्षण व्हावे यासाठी श्री सदस्यांतर्फे या वृक्षांच्या सभेवताली कुंपण घातले आहे.

### खोपोलीत श्री सदस्यांचा उपक्रम

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून केलेली या वृक्षांची लागवड श्री सदस्य मनापासून करीत आसल्याने या ठिकाणी सध्या वनराई फुलल्याचे चित्र पहायला मिळत आहे.

दरवर्षी श्री प्रतिष्ठानांच्या माध्यमातून वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविले जातात. गेली अनेक वर्षे पावसाळ्यात वृक्षलागवड आणि त्यांचे संवर्धन हा कार्यक्रम हाती घेण्यात येत असतो. खालापूर तालुक्यातही अनेक ठिकाणी विविध पिंपळ, निळगिरी, कडुनिंब, ताम्हण, करंज, अर्जुन, रिठा, सफकर्णी, कुंतजीवा, निंबारा, रेन ट्री, वड या वृक्षांची लागवड करण्यात आली. पावसाळ्यात लावलेल्या या वृक्षांच्या बाजूला वाढलेले गवत काढून गुरांपासून या वृक्षांचे संरक्षण व्हावे यासाठी झाडांभोवती लाकडाचे कुंपण घालण्यात आले आहे. सध्या श्री सदस्यांकडून या झाडांना पाणी घातले जात आहे.

## माथेरानमध्ये वृक्षसंगोपनासाठी जनजागृती

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

गर्द झाडी घनदाट जंगल अशीच ख्याती असलेल्या माथेरानमधील हिरवळ वादळी वाऱ्याने तसेच अतिवृष्टीमुळे लोप पावत आहे. यासाठी स्वच्छता दूत राकेश कोकळे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे.

माथेरानची हिरवळ टिकविण्यासाठी राकेश कोकळेंसह त्यांचे सहकारी प्रयत्न करीत आहेत. या होतकरु युवकांकडून झाडांचे जतन करण्यासाठी जनजागृती केली जात आहे ती खरोखरच वाखाणण्याजोगी आहे.

यासाठी राकेश कोकळे यांना करण जानकर, अनिकेत कोकरे, पंकज कोकरे, राजू जाबरे, गणेश बिरामने, शैलेश ढेबे, शुभम सपकाळ, दीपक रांजणे, किशोर कासुर्डे, प्रकाश मोरे, अर्जुन जानकर, राजेश जानकर, हावा ओकारे यांचे सहकार्य लाभले असून यासाठी स्थानिकांसह पर्यटकांनाही आवाहन केले जात आहे.

# मुरूडचे शिधापत्रिकाधारक गहू वितरणाच्या प्रतीक्षेत

## पुरवठा विभागाकडून कार्यवाहीची अपेक्षा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड शहरात रास्त धान्य दुकाने चार असून या ठिकाणी शिधापत्रिकाधारकांना गहू व तांदुळाचे वितरण केले जाते, परंतु महिना संपत आला तरी गहु मिळत नसल्याने शिधापत्रिकाधारकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

गरजूंवर उपाशी राहण्याची वेळ येऊ नये यासाठी केंद्र सरकाराने प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत शिधापत्रिकाधारकांना मोफत धान्य दिले जाते. या योजनेत गरिबांना कोणतेही पैसे द्यावे लागत नाही. हे धान्य दर महिना शिधापत्रिकावरील एका व्यक्तीस तीन किलो तांदूळ व दोन किलो गहूचे वितरण इ-पॉस मशिनद्वारे दिले जाते, परंतु महिना संपत आला, तरी मुरूड पुरवठा विभागाकडून गहुचे वितरण न झाल्याने शिधापत्रिकाधारकांना गहूपासून वंचित राहावे लागत आहे. वारंवार दुकानात फेऱ्या माराव्या लागत असल्याने नागरिकांची मोठी परवड होत आहे.

रेशनदुकानदारांनी याबाबत सांगितले की, गहू येईल, पण तारीख सांगत नाही. यामुळे आता शिधापत्रिकधारकांनी करायचे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.



# नवी मुंबई महापालिकेचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या वतीने आयोजित नमस्ते या कार्यशाळेच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई महानगरपालिका सफाई मित्रांच्या कामातील सुरक्षेविषयी घेत असलेल्या काळजीबद्दल प्रशंसा केली.



भारताच्या स्वच्छता परिसंस्थेत यांत्रिकी पद्धतीने स्वच्छता तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देऊन कामाच्या परिस्थितीत सुधारणा घडवत स्वच्छता कामगारांचे कल्याण नजरेसमोर ठेवून मॅन्युअल स्कॅव्हेंजिंग कायदा, २०१३ची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने नमस्ते हा राष्ट्रीय उपक्रम घोषित करण्यात आला असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नवी मुंबई महापालिकेच्या सफाईमित्र कार्यपद्धतीची माहिती देणारी लघुचित्रफितही प्रदर्शित करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मनोगतात नवी मुंबई महानगरपालिका ज्या फुलप्रुफ पद्धतीने सफाईमित्रांच्या सुरक्षेची काळजी घेते तशा प्रकारची अंमलबजावणी सर्वांकडून व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यशाळेमध्ये नवी मुंबईसह पुणे, ठाणे व नागपूर महानगरपालिकांमार्फत मॅनहोल ते मशीनहोल पद्धतीनुसार मलनि:स्सारण वाहिन्या व सेप्टीक टँक यांच्या स्वच्छतेबाबत यांत्रिकी पद्धतीने अंगिकारल्या जाणाऱ्या बेस्ट प्रॅक्टीसेसचे सादरीकरण करण्यात आले.

# नवी मुंबई एमआयडीसी भागात दोन दिवस पाणी बंद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागाने दिलेल्या सुचनेनुसार महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ विभागाच्या बारवी धरणातील पाणीपुरवठा शुक्रवारी (दि. २६) दुपारी १२ ते शनिवारी (दि. २७) दुपारी १२ वाजेपर्यंत असे २४ तास बंद राहणार आहे.

या कालावधीत नवीन जलवाहिन्यांवरील गुरुत्व जल कार्यान्वित करण्याचे काम करण्यात येणार असल्याने एमआयडीसीच्या जलवाहिनीवर अवलंबवून असणाऱ्या भागात पाणीपुरवठा होणार नाही. त्यानंतर या भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. नागरिकांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## पनवेल मनपा हद्दीत विद्रुपीकरण करणाऱ्यांवर होणार कडक कारवाई!

या संदर्भात पनवेल महापालिकेने रीतसर नोटीस देऊनही प्रहार अकॅडमी, कमांडो करिअर अकॅडमी व प्रिया न्यू बँक जॉबने दंडाची रक्कम भरली नसल्याने त्यांच्यावर फौजदारी प्रक्रिया संहिता (एफआयआर) दाखल करण्यात आली आहे तसेच सिटी बाईक्स पॉईंट, प्री. स्कूल (किड्स क्लब), मातोश्री हॉस्पिटल यांना नोटीस बजावण्यात आली आहे. त्यामुळे मालमत्ता विद्रुपीकरण कायदा १९९५, उच्च न्यायालय यांच्या आदेशान्वये कडक कारवाई करण्याचे निर्देश महापालिकेने दिले आहेत.

**दंड लावण्यात आलेल्या संस्थेचे नाव व रक्कम**

- प्रहार अकॅडमी, तक्का-पनवेल (दंड रक्कम दोन लाख ९४ हजार रुपये)
- सिटी बाईक्स पॉईंट, तक्का-पनवेल (दंड रक्कम एक लाख रुपये)
- मातोश्री हॉस्पिटल, पनवेल (दंड रक्कम ६७ हजार २०० रुपये)
- प्री. स्कूल (किड्स क्लब) पनवेल (दंड रक्कम २२ हजार ८०० रुपये)
- कमांडो करिअर अकॅडमी, तक्का-पनवेल (दंड रक्कम १० हजार रुपये)
- प्रिया न्यू बँक जॉब, मुलूंड (दंड रक्कम १० हजार रुपये)

# गिधाड संवर्धनासाठी हवी स्थानिक ग्रामस्थांची साथ!

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यामधील फणसाड अभयारण्य हे सुमारे ५४ चौरस किमी परिसरात विस्तार असलेले मोठे अभयारण्य आहे. काही महिन्यांपूर्वी फणसाड अभयारण्यात गिधाडांचे संवर्धन व त्यांची संख्या वाढण्यासाठी ग्रीन वर्क ट्रस्ट व फणसाड अभयारण्याच्या माध्यमातून गिधाडांच्या आहार केंद्राची संकल्पना कार्यान्वित करण्यात आली आहे.

यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीला पत्र देऊन आपल्या हद्दीतील मृत जनावर असल्यास तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले, परंतु या मोहिमेस अत्यन्त अल्प प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे या गिधाड संवर्धन मोहिमेला स्थानिक ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### फणसाड अभ्यारण्यात आहार केंद्र स्थापन

या मोहिमेसाठी शासनाकडून कोणताही निधी प्राप्त होत नसल्याने अडचणी निर्माण होत आहे. गिधाडांच्या आहार केंद्राची संकल्पना सुरू झाल्यापासून मृत जनावर मिळाले नाही. त्यामुळे गिधाडांचा वावर सुरू होणार कसा असा प्रश्न येथे निर्माण झाला आहे. या अभयारण्यात नुकताच इजिप्शियन व्हल्चर (गिधाड) सापडले असून त्याचे वास्तव्य या ठिकाणी वाढवण्याची विशेष प्रयत्न केले जात असल्याची माहिती तुषार काळभोर यांनी दिली आहे, मात्र गिधाडांच्या या आहार केंद्राला नागरिकांच्या सहकार्याची गरजेचे असल्याने नागरिकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## दुखवटा

### मालती चौधरी



**चौक** : खालापूर तालुक्यातील चौक गावच्या मालती पंढरीनाथ चौधरी यांचे वयाच्या ८२व्या वर्षी निधन झाले. सुप्रसिद्ध पेंटर, फोटोग्राफर नंदकुमार चौधरी आणि ज्येष्ठ समाजसेवक अविनाश चौधरी यांच्या त्या मातोश्री होत्या. एक उत्कृष्ठ गृहिणी, महिलांना मार्गदर्शक आणि परिसरातील सुखदु:खात सहभागी होणे हा त्यांचा स्वभाव होता. वारकरी संप्रदायाचा प्रभाव त्यांच्यावर होता. त्यांच्या अंत्यविधीसाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

### कृष्णा मोहिते



**पनवेल** : खालापूरमधील अॅड. नितीन मोहिते यांचे वडील कृष्णा रामा मोहिते यांचे वयाच्या ६९व्या वर्षी निधन झाले. वासरंग येथील सामाजिक क्षेत्रातील चांगले कामाची पोहचपावती असणारा समाज सेवक काळाच्या पडद्याआड निघून गेल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनानंतर शोकसभा व पुण्यानुमोदणाचा कार्यक्रम शुक्रवारी (दि. २६) सकाळी ११ वाजता त्यांच्या राहत्या घरी होणार आहे. सर्वांनी कार्यक्रमास त्यांना श्रद्धांजली देण्यासाठी उपस्थित राहावे अशी विनंती अॅड. नितीन मोहिते यांनी केली आहे.

## निवडक

### रसायनीत मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** रसायनी पोलीस ठाणे हद्दीतील एका पार्कींगमध्ये उभ्या असलेल्या मोटरसायकलची चोरी झाली असून याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रसायनी येथील कल्पतरु हाउसिंग सोसायटी बिल्डींगच्या पार्कींगमध्ये रिस येथे फिर्यादी (रा. रिस) यांनी त्यांची एकूण ५००० रुपये किमतीची युनिकॉन (एमएच ०६ एयु ३६६५) लाल काळी मोटरसायकल अज्ञाताने चोरली. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन अधिक तपास महिला पोलीस हवालदार सारिका घरत या करीत आहेत.

### अवैध दारू विक्रीप्रकरणी कारवाई

**पनवेल :** अवैधपणे दारू विक्री करणाऱ्याविरोधात कामोठे पोलिसांनी कारवाई करत हजारो रुपये किमतीची दारू जप्त केली आहे. कामोठे परिसरातील मोठ्या प्रमाणात अवैधपणे दारू विक्री होत असल्याची माहिती कामोठे पोलिसांना मिळाली. त्यानुसार कामोठे पोलिसांनी छापा टाकत खांदेश्वर ढाबा येथे टाकून अवैध दारूसाठा जप्त केला आहे. याप्रकरणी कामोठे पोलिसांनी खांदेश्वर ढाब्याचे सर्फराज खान याच्याविरोधात कामोठे पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.

# खरीप हंगामाची पूर्वतयारी

## चिरले येथे शासन आपल्या दारी उपक्रम





**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरले गावात, उरण तालुका कृषी अधिकारी किसन शिगवण यांच्या मार्गदर्शनाखाली, खरीप हंगाम विशेष पंधरवडा मोहीम अंतर्गत बीज प्रक्रिया व उगवण क्षमता चाचणी कार्यक्रम मंगळवारी (दि. २३) घेण्यात आला होता. सध्या सर्वत्र खरीप हंगामाची पूर्वतयारी सुरू असून, शासन आपल्या दारी हा उपक्रम सर्वत्र राबविला जात आहे.

चिरले येथे उरण तालुका कृषी अधिकारी किसन शिगवण यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात तालुका कृषी अधिकारी शिगवण यांनी ग्राम बिजोउत्पादनाचे महत्त्व विशद केले.कृषी पर्यवेक्षक व्ही. एस. ढवळ यांनी उत्पादनात वाढ होण्यासाठी शेतकऱ्यांसाठी बीज प्रक्रिया महत्त्वाची असल्याचे सांगितले.

कृषी सहाय्यक अधिकारी डी. टी. केणी यांनी फळबाग लागवड योजना आणि शेती विषयक अवजारे या महत्त्वपूर्ण योजनांची माहिती देऊन, बियाणे उगवण, क्षमता अर्थात बीज प्रक्रियेचे शेतकऱ्यांना महत्त्व पटवून देऊन, प्रात्यक्षिक करून दाखविले. दरम्यान तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापनच्या कविता ठाकूर यांनी कृषीच्या विविध योजना व प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया, उद्योग योजनांची विस्तृत माहिती या वेळी शेतकऱ्यांना दिली.

या वेळी चिरले गावातील महिला भगिनी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषी विभाग उरणचे अधिकारी आणि चिरले ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# खारघरमध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव

## श्वान निर्बीजीकरण करा; नेत्रा पाटील यांची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर शहरातील जलवायू विहार सोसायटीमध्ये भटक्या कुत्र्यांच्या उपद्रव वाढला असून या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात यावे, अशी मागणी पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

खारघर शहरातील माझ्या प्रभाग क्रमांक ४ मधील जलवायू विहार फेज वन या सोसायटीत जवळपास ९०० सदनिका धारक राहतात. या रहिवाशांनी माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांच्याकडे तक्रार केलेली आहे की, या सोसायटीत मोठ्या प्रमाणात भटके कुत्रे आहेत. या कुत्र्यांमुळे सोसायटीतील रहिवाशांचे राहणेदेखील कठीण झालेले आहे. त्याचबरोबर त्यांचा जीवदेखील धोक्यात आलेला आहे. भटक्या कुत्र्यांनी अनेक लहान मुलांना तसेच काही ज्येष्ठ नागरिकांना चावा घेण्याचे गंभीर प्रकारही



या ठिकाणी घडले आहेत.

याबाबत वेळोवेळी त्यांनी त्या प्रकारच्या तक्रारीदेखील पनवेल महापालिकेकडे केलेल्या आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार मागील एक वर्षापासून सदर सोसायटीतील भटक्या कुत्र्यांचे (स्टरलायझेशन) निर्बीजीकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे व त्यांचा त्रासदेखील वाढत चालला आहे. या गंभीर प्रकारात लक्ष घालून त्या ठिकाणच्या भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करून या ठिकाणच्या रहिवाशांना होणाऱ्या त्रासातून त्यांची सुटका करावी, असे नेत्रा किरण पाटील यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे.

# नवीन पनवेलमध्ये एकाची हत्या

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात कारणावरून अज्ञात व्यक्तीची कोणत्या तरी हत्याराने निघृण हत्या करून हा मृतदेह नाल्यात टाकून ते पसार झाल्याची घटना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

नवीन पनवेल उड्डाणपुलाखालील रेल्वेपटरीजवळ असलेल्या वाहत्या नाल्यात अंबिकानगर सोसायटीजवळ एका व्यक्तीचा मृतदेह तरंगत असल्याचे स्थानिकांना आढळून आहे. त्यांनी तत्काळ खांदेश्वर पोलिसांना याबाबत माहिती कळवली. खांदेश्वर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत सदर मृतदेह नाल्यातून बाहेर काढला असता त्याच्या कपाळावर डाव्या डोळ्याच्या डाव्या बाजूस उजव्या हाताच्या दंडावर व पार्श्वभागावर कोणत्यातरी धारदार शस्त्राने वार करून त्याला जीवे ठार मारले व त्याची ओळख पटू नये म्हणून त्याच्या अंगातील सर्व कपडे काढून त्याचा मृतदेह नवीन पनवेल उड्डाणपुलाखालील रेल्वेपटरीजवळ असलेल्या वाहत्या नाल्यात टाकून ते पसार झाले आहेत.

मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे असून तो रंगाने सावळा, अंगाने मजबूत, उंची १७४ सेमी आहे. तसेच पायात काळे सॉक्स घातलेले आहे. या व्यक्तीबाबत किंवा घटनेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास खांदेश्वर पोलीस ठाणे (०२२-२७४६५३३८) किंवा महिला पोलीस निरीक्षक गलांडे मॅडम यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कळंबोलीमधील मुलींच्या शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील सामाजिक न्याय विभागाच्या कळंबोली येथील मुलींचे शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, हे सेक्टर १०, प्लॉट नं.२१ ग्रीन पार्क सोसायटीसमोर कळंबोली येथे कार्यरत आहे. या वसतिगृहामध्ये इयत्ता आठवीपासून गरीब, हुशार, होतकरु, मागासवर्गीय अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर

### ‘ही’ कागदपत्रे जोडणे आवश्यक

*प्रवेशपात्र विद्यार्थिनींच्या पालकांचे सर्व मार्गानी वार्षिक उत्पन्न अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विद्यार्थीनीकरिता रुपये दोन लाख ५० हजारांचे आत, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रर्वग, विद्यार्थीनींकरिता रुपये एक लाखाच्या आत असावे. ऑनलाईन प्रवेश अर्जासोबत तहसीलदार यांच्या सहीचा सन २०२२-२३ मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक, आधारकार्ड या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहेत.*

मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्टया मागास, अनाथ व अपंग यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थीनींकरिता मोफत निवासव्यवस्था असून नाष्टा दररोज पोहे/शिरा/उपीट इ. पैकी एक,उकडलेली दोन अंडी, सफरचंद, आणि ऋतुमानानुसार एक फळ व दूध तसेच भोजन व्यवस्थेमध्ये जेवण (डाळ, भात, चपाती, भाजी/ उसळ, लोणचे, पापड इत्यादींसह आठवड्यातून दोन वेळा मासांहार) देण्यात येतो.

अभ्यासाकरिता लागणारी वह्या, पुस्तके, शैक्षणिक व लेखन साहित्य देखील विनामुल्य पुरविले जाते. तसेच दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता म्हणून ६०० रुपये निर्वाहभत्ता दिला जातो. शालेय विद्यार्थीनींना रुपये एक हजार व महाविद्यालयीन विद्यार्थीनींना दोन हजार रुपये गणेश भत्ता दिला जातो. सर्व विद्यार्थीनींना छत्री, रेनकोट व गमबुटसाठी ५०० रुपये भत्ता दिला जातो. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थीनींना शैक्षणिक साहित्य भत्ता चार हजार रुपये व प्रोजेक्ट भत्ता एक हजार रुपये दिला जातो. या व्यतिरिक्त संगणक, ग्रंथालय सुविधा, क्रिडासाहित्य, मनोरंजन इत्यादी अनेक सुविधा उपलब्ध आहेत.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे वसतिगृहात विनामूल्य उपलब्ध करण्यात आले आहेत. अधिक माहितीकरिता मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहाचे गृहपाल एम. जे. नरहरे यांच्याशी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन गृहपाल एम. जे. नरहरे यांनी केले आहे.





**पनवेल :** सुकापूर येथील साई एन्क्लेव्ह सहकारी गृहनिर्माण सोसायटीमधील गणपती मंदिराचा जीर्णोद्धार बुधवारी करण्यात आला. यानिमित्त होम हवन आणि विविध धार्मिक कार्यक्रम या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, सुकापूरच्या सरपंच योगिता पाटील, उपसरपंच दिव्येश भगत, सदस्य महेश पाटील आदी उपस्थित होते.

# खरेदीच्या बहाण्याने साड्यांची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरात नव्याने सुरू झालेल्या द्वारकादास शामकुमार एक्सक्लुसिव्ह साड्यांच्या दुकानांमधून खरेदीच्या बहाण्याने आलेल्या दोन महिलांनी महागड्या साड्या लांबवल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल झाला आहे.

पनवेलमधील क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या इमारतीमध्ये नव्याने सुरू झालेल्या द्वारकादास शामकुमार एक्सक्लुसिव्ह साड्यांच्या दुकानामधून खरेदीच्या बहाण्याने आलेल्या दोन महिलांनी लाखो रुपये किमतीचे सात पैठणी व चार कांजीवरम साड्या चोरी केल्या. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून याबाबत पनवेल शहर पोलीस अज्ञात महिलांचा शोध घेत आहेत.

दरम्यान, पनवेलमध्ये चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. या चोरांचा शोध लावल्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे.

# उसर्ली खुर्दच्या माजी सरपंचांच्या गैरव्यवहाराबाबत कोर्टाचे आदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बनावट कागदपत्रे तयार करून नैना क्षेत्रात बांधकाम परवानगी दिल्याप्रकरणी उसर्ली खुर्द ग्रामपंचायतीचे शेतकरी कामगार पक्षाचे माजी सरपंच प्रमिला मोहन भगत आणि विश्वास लक्ष्मण भगत यांचा अटकपूर्व जामीन अर्ज पनवेल येथील सत्र न्यायालय तसेच उच्च न्यायालयाने फेटाळला होता. यानंतर त्यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली असता आरोपींच्या गैरव्यवहाराबाबतचा अहवाल सहा आठवड्यांत सादर करण्याचे आदेश कोर्टाने शासनाच्या संबंधित विभागाला दिले आहेत.




माजी सरपंच प्रमिला भगत व विश्वास भगत यांनी अधिकार नसताना उसर्ली खुर्द ग्रामपंचायतीची बोगस कागदपत्रे व शिक्के तयार करून ग्रामपंचायत हद्दीतील नैना क्षेत्रात अनेक बांधकाम परवानग्या दिल्या होत्या. नैना स्थापन होण्यापूर्वीची तारीख टाकून या परवानग्या दिल्या असल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पनवेलच्या गटविकास अधिकाऱ्यांना प्रमिला भगत व विश्वास भगत यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार उसर्ली खुर्दचे ग्रामसेवक आर. एम. ढेरे यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात प्रमिला भगत आणि विश्वास भगत यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी लेखी तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने प्राप्त पुराव्याच्या कागदपत्रांची छाननी करून पनवेल शहर पोलिसांनी तत्कालीन सरपंच विश्वास भगत व प्रमिला भगत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या पार्श्वभूमीवर विश्वास भगत व प्रमिला भगत यांनी अटकपूर्व जामीन मिळावा यासाठी पनवेल येथील सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता, मात्र हा अर्ज ७ डिसेंबर २०२२ रोजी न्यायालयाने फेटाळला. या प्रकरणाची कसून चौकशी करावी, असे आदेश न्यायालयाने दिले होते. उच्च न्यायालयानेदेखील माजी सरपंचांचा अटकपूर्व जामीन २० फेब्रुवारी २०२३ रोजी फेटाळला व संबंधित विकसकांना सहआरोपी करून चौकशी सुरू करण्याचे आदेश दिले.


यानंतर माजी सरपंचांनी अटकपूर्व जामिनासाठी सुप्रीम कोर्टात धाव घेतली. कोर्टाने ही याचिका दाखल करून घेऊन शेतकरी कामगार पक्षाचे माजी सरपंच प्रमिला मोहन भगत आणि विश्वास लक्ष्मण भगत यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबतचा सर्व अहवाल बोगस कागदपत्रांसहीत सहा आठवड्यांत लेखी सादर करण्याचे आदेश राज्य शासनाला दिले आहेत. त्यामुळे शासनाच्या अहवालानंतर सुप्रीम कोर्टात या प्रकरणी पुढील कार्यवाही होणार आहे.

# ‘संस्कार भारती’तर्फे ऑनलाईन साहित्यसभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संस्कारभारती कोकण प्रांत साहित्यविधेच्या वतीने पहिल्या मासिक ऑनलाईन साहित्यसभेचे आयोजन करण्यात आले. याला कोकण परिसरातील साहित्यिक व साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लेखिका डॉ. स्मिता दातार यांनी सहभागी साहित्यप्रेमींना मार्गदर्शन केले.

डॉ. दातार म्हणाल्या की, उत्तम लेखनासाठी भाषासमृद्धी, चिंतनशीलता, निरिक्षण, उत्तम वाचन आणि संवेदनशीलता या गोष्टी आवश्यक आहेत. शिस्त, सातत्य, दिनचर्या या नियमांचे पालन करत साहित्यातील विविध विषयांवर लेखन करावे, असे आवाहन त्यानी केले. साहित्यप्रेमींना एकत्र जोडून घेण्यासाठी समाजमाध्यमांचा योग्य वापर केला जात आहे, अशा शब्दांत त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.




या उपक्रमात सहभागी साहित्यप्रेमींनी विनोदी कथा, कविता, लेख आदी प्रकारांचे सादरीकरण केले. सुमंत जुवेकर आणि गायत्री जोशी यानी कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन केले. यावेळी साहित्यविधेच्या पहिल्या विशेषांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी रात्री ९.३० ते १०.३० या वेळेत ऑनलाईन साहित्य सभेचे आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये नामवंत लेखक मार्गदर्शन करणार आहेत. तसेच नवोदित साहित्यिकांना सादरीकरण करण्याची संधी उपलब्ध होणार आहे, अशी माहिती साहित्यविधेच्या महेश नाईक दिली. सर्व साहित्यप्रेमींनी याचा आस्वाद घेण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रचंड उन्हामुळे ‘निरा’ला मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाढत्या तापमानामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांचा अधिकाधिक ओढा हा शीतपेय, सरबत पिण्याकडे जास्त दिसतो, मात्र थंडगार सरबतांसोबत गुणकारी, आरोग्यवर्धक अशा ‘निरा’लाही मोठी मागणी असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

उन्हाळ्यात शरीराचा समतोल राखण्याचे महत्त्वाचे काम ‘निरा’ करते. जवळपास ३९ अंश इतक्या तापमानाचा मानवी आरोग्यावर परिणाम होतो. यात डिहायड्रेशनसारखे आजार उद्भवल्याचे दिसून येते. या सर्व आजारांवर मात करण्यासाठी शीतपेयांमध्ये ‘निरा’ हे गुणकारी शीतपेय ठरते आहे. नारळाचे झाड, खजूर, सिंदीवरून काढलेला ताजा रस म्हणजे निरा. मार्चपासूनच महामार्गालगत ‘निरा’ विक्री केंद्र लागण्यास सुरुवात होते. महामार्गावर या ‘निरा’ केंद्रांचे स्टॉल पाहायला मिळतात. येथे २०० मिली निरा दहा रुपयांना मिळते.

अतिउष्मा यामुळे मानवी आरोग्यावर होणारे



परिणाम पाहता डिहायड्रेशन, अस्वस्थता, थकवा मोठ्या प्रमाणात जाणवते. या सर्वांवर निरा हे परिणामकारक शीतपेय असून ते शरीराचा समतोल राखण्यास मदत करते. ग्रामीण भागात असलेल्या नारळ, सिंदी आणि खजुराच्या झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. या झाडांवरून ताजा रस मडकी लावून जमा केला जातो. त्यानंतर हा रस एकत्रित करून संपूर्ण महाराष्ट्रात वितरित केला जातो. सध्या पनवेलसह आसपासच्या भागातही ‘निरा’ विक्रीसाठी उपलब्ध आहे.

# स्व. मनोज संसारे यांची रविवारी अभिवादन सभा

**पनवेल : वार्ताहर**

फुले शाहू आंबेडकरी चळवळीचा ढाण्या वाघ स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख कालकथित पँथर मनोजभाई संसारे यांना आदरांजली वाहण्यासाठी रविवारी (दि. २८) पनवेल शासकीय विश्रामगृह येथे आदरांजली व अभिवादन सभेचे आयोजन रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे.



मनोज संसारे हे स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष होते. ते दोन वेळा मुंबई महापालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले होते. २०२४च्या निवडणुकीत ते विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या वतीने लढणार होते. त्यांनी आयुष्यात कधीही तत्वांशी तडजोड केली नाही. महाराष्ट्रातील सर्व प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. मनोज संसारे यांना अभिवादन व आदरांजली वाहण्यासाठी रविवारी अभिवादन सभेचे आयोजित केली आहे.


## संपादकीय

# मृगजळाची तहान

**कर्नाटकात काँग्रेसने भारतीय जनता पक्षाला नुकतेच पराजित केल्यानंतर महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये भलताच जोश संचारला आहे. एकीकडे मुंबई-पुणे आदी महत्त्वाच्या पालिका किंवा इतर स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या निवडणुकांची चिन्हे दिसत नसल्याबद्दल आगपाखड करतानाच, दुसरीकडे आघाडीतील तिन्ही पक्षांनी थेट लोकसभा निवडणुकीचीच तयारी सुरू केलेली दिसते आहे.**

राजकीय लबाड्या करून सुमारे साडेतीन वर्षांपूर्वी सत्तेचा गड काबीज करण्याचे कारस्थान यशस्वी झाल्यानंतर महाविकास आघाडीचे काही नेते पावसाळ्यातील बेडकीसारखे भराभर फुगले, परंतु अहंकाराची ही हवा अडीच वर्षांतच संपल्याने सत्तेवाचून तडफडण्याची वेळ महाविकास आघाडीवर आली. सत्तेवाचून हताश झालेल्या या नेत्यांमध्ये कर्नाटकातील ताज्या निवडणूक निकालानंतर मात्र भलताच उत्साह निर्माण झालेला दिसतो. आघाडीच्या काही नेत्यांची वक्तव्ये ऐकली तर लोकसभा जवळपास जिंकल्याचाच आत्मविश्वास त्यांच्या बोलण्यातून दिसतो आहे. इतकेच नव्हे तर लोकसभा निवडणुकीसाठी जागा वाटपाच्या मुद्यावरून या नेते मंडळींनी दंड थोपटायलाही सुरूवात केली आहे. इथे स्थानिक निवडणुकींचा पत्ता नाही आणि यांची स्वप्ने लोकसभा जिंकण्याची, हा प्रकार हास्यास्पदच म्हणायला हवा. साहजिकच या नेत्यांच्या वक्तव्यांची समाजमाध्यमांमध्ये दिवसेंदिवस रेवडी उडवली जाताना दिसते आहे. लोकसभा निवडणुकीला अजून वर्षभराचा अवकाश आहे. सत्ताधारी भारतीय जनता पक्ष याबाबत कुठलेही वक्तव्य करताना दिसत नाही. किंवा तयारीही करताना दिसत नाही. अर्थात याचे प्रमुख कारण भाजपमधील पक्षशिस्त हे आहे. तर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष हे तीन दिशांना तीन तोंडे असणारे पक्ष आहेत. लहान भाऊ कोण, मोठा भाऊ कोण असले प्रश्न त्यांना आताच पडू लागले आहेत तर थोरले-धाकटे ठरवण्यासाठी आम्ही डीएनए टेस्ट करू असे बाष्कळ वक्तव्य ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी केले आहे. मूलत: महाविकास आघाडी हे सत्तेच्या गरजेपोटीच एकत्र आलेले कडबोळे आहे. या आघाडीत खऱ्या अर्थाने मनोमिलन कधीच झालेले नव्हते, परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अलीकडेच आघाडीतील तिन्ही पक्षांच्या नेत्यांची बैठक घेतल्यानंतर आघाडीत निराळेच वारे वाहू लागले. प्रत्येक पक्षाच्या नेत्यांनी आपापल्या गोटात जोर बैठका काढायला सुरूवात केली आहे. ठाकरे गटाचे प्रवक्ते तर रोजच्या रोज आपण किती जागा लढवणार याच्या गमजा मारत आहेत तर काँग्रेसच्या विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीत जागावाटप हे पक्षबळानुसारच होईल अशी आरोळी ठोकण्यात आली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी तर राष्ट्रवादी काँग्रेस मोठा भाऊ, काँग्रेस मधला आणि ठाकरे गट सर्वात धाकटा अशी क्रमवारी देखील जाहीर करून टाकली. अर्थात आघाडीच्या राजकारणात प्रत्येक पक्षाला आपले बळ वाढवण्यातच सर्वाधिक रस असतो हे नाकारण्यात अर्थ नाही. त्यामुळे लोकसभा निवडणुका उंबरठ्यावर येईपर्यंत हे तिन्ही पक्ष एकमेकांशी असेच भांडत-झगडत राहतील यात शंका नाही. लोकसभेच्या गेल्या निवडणुकीत शिवसेनेचे १८ खासदार निवडून आले होते, त्यापैकी १५ जण आज शिंदे गटात आहेत. राष्ट्रवादीचे चार खासदार लोकसभेत पोचले होते तर काँग्रेसचा अवघा एक उमेदवार निवडून आला होता. आता राजकीय परिस्थिती पार उलटीपालटी झाली आहे. महाविकास आघाडीची अवस्था मृगजळापाठीमागे धावणाऱ्या प्राणीमात्रांसारखी झाली असून सत्तेचे मृगजळ त्यांना तहानलेलेच ठेवेल याचीच ही लक्षणे मानायला हवीत.

# कवींद्र परमानंद समाधी सौंदर्यीकरण पूर्ण व्हावे



पोलादपूर शहरातील शिवकालीन स्वामी कवींद्र परमानंद यांच्या समाधीस्थळी दरवर्षी मकरसंक्रांतीचा वार्षिकोत्सव आणि गुढीपाडव्यानिमित्त गुढी उभारण्याचा उपक्रम अखंडीतपणे सुरू आहे, मात्र येथे गेल्या काही वर्षांपूर्वी सौंदर्यीकरणाचे काम रखडल्यानंतर साकारण्यात आलेल्या दुर्गसृष्टीकडे संबंधित संस्थेकडून गेल्या चार पाच वर्षांपासून अक्षम्य दुर्लक्ष झाल्याने ऐतिहासिक वारशाचे वलय संपले आहे. समाधीस्थळी बांधण्यात आलेल्या मठामध्ये परमानंदांच्या जीवनाचा अल्पपरिचय देणारा लेखही या संस्थेकडून भिंतींना रंगसफेदीदरम्यान पुसण्यात आला असून स्थानिक कवी स्वामी परमानंद मित्र मंडळ या नोंदणीकृत संस्थेने याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. पोलादपूर शहरातदेखील या प्रकरणी सर्वस्तरातून नाराजी व्यक्त होऊ लागली आहे.

विधान परिषद सदस्य अशोक मोडक यांच्या निधीतून तत्कालीन भाजपा तालुकाध्यक्ष मनोज भागवत यांच्या पाठपुराव्यातून १९ एप्रिल १९९७ रोजी स्वामी कवींद्र परमानंद यांच्या समाधीस्थळी झालेल्या सुशोभिकरणाचा उद्घाटन सोहळा तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. गोपीनाथ मुंडे, बांधकाममंत्री नितीन गडकरी, राज पुरोहित आणि आ. अशोक मोडक यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी याठिकाणी समाधीस्थळ आणि वाचनालयाची खोली यांचा समावेश होता. या वेळी परमानंदांच्या जीवनाचा अल्पपरिचय देणारा लेख भिंतीवर रंगविण्यात आला होता. यानंतर ग्रामपंचायतीकडून रायगड जिल्हा परिषदेमार्फत तत्कालीन उपाध्यक्ष स्व. माणिक जगताप यांनी स्वामी परमानंद मित्र मंडळ या नोंदणीकृत संस्थेला दिवाबत्तीसाठी काही रक्कमेची तरतूद केली होती. याशिवाय, पोलादपूर ग्रामपंचायतीने काही रक्कम खर्ची घालून संरक्षण भिंत तसेच रायगड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्यकार्यकारी अधिकारी पानिपतकार विश्वास पाटील यांनी सौंदर्यीकरणासाठी निधीची उपलब्धता केली. हे काम अपूर्ण असतानाच एका स्थानिक संस्थेमार्फत येथे दुर्गसृष्टी उभारण्याचे काम सुरू झाले. यानंतरही काही लोकप्रतिनिधींनी येथे निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिल्यानंतर त्याची पूर्तता न झाल्याने या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांतील उत्साह कमी झाला. साधारणत: तोरणा, सिंधुदुर्ग, राजगड, शिवनेरी, चाकण, लोहगड, पुरंदर, प्रतापगड, जंजिरा आदींसह १७ भूईकोट, जलदुर्ग आणि गडकिल्ले यांच्या प्रतिकृती उभारल्यानंतर याकामी पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होऊ लागले आहे. परमानंदांच्या जीवनाचा अल्पपरिचय देणारा लेखही या संस्थेकडून भिंतींना रंगसफेदीदरम्यान पुसण्यात आला असल्याबद्दल सातत्याने विचारणा होऊनही आम्ही पक्क्या स्वरूपात लेख लिहिणार असल्याची माहिती संबंधितांकडून दरवर्षी देण्यात येत आहे.

शिवशाहिर बाबासाहेब पुरंदरे यांनी या कवींद्र परमानंद समाधीस्थळी भेट देऊन नतमस्तक होताना छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले एवढे टिल्ले टिल्ले कसे, असा उपहास करीत शिवछत्रपतींच्या गडकिल्ल्यांची उंची अशी की गगनाकडे पाहताना डोईवरील टोपी पगडी फेटा धुळीत पडेल, अशी खात्री असावी, असे मत व्यक्त केले होते. पोलादपूर शहराच्या मध्यवर्तीठिकाणी असलेल्या या कवींद्र परमानंद मठ परिसरात हिंदू मुस्लीम ऐक्याची प्रचिती संक्रांत आणि गुढीपाडवा मेळाव्यासह अनेक सार्वजनिक उत्सवप्रसंगी दिसून आली आहे. पोलादपूर ग्रामपंचायतीची नगरपंचायत झाल्यानंतर याठिकाणचे स्थानिक नगरसेवक संगिता इंगवले आणि सध्याचे स्थानिक नगरसेवक प्रसाद इंगवले या मुलगा व आईंनी संघटनात्मक कार्यासह या स्वामी कवींद्र परमानंद मठामधील

**खबरबात**
**शैलेश पालकर**

उत्सव सुरू ठेवले. अलिकडेच, या समाधीस्थळाचे सुशोभिकरण करण्यासाठी नगरपंचायतीने खर्च केला असून महाबळेश्वर रस्त्यालगतच्या बाजारपेठ रस्त्याच्या प्रारंभी दहा पावलांवर या मठाच्या प्रवेशद्वाराची कमान उभारण्यात आली आहे. ऐतिहासिक वास्तुला सध्या अत्याधुनिक कार्यालयासारखे स्वरूप आणून झालेले सुशोभिकरण जरी दृष्टीकोनातून खटकत असले तरी सुशोभिकरण झाले असल्याचे समाधान वाटत आहे.

यादरम्यान, स्थानिक कवी स्वामी परमानंद मित्र मंडळ या संस्थेकडून दरवर्षी मकरसंक्रांतीचा वार्षिकोत्सव आणि आनंदनगरकडून चैत्र प्रतिपदेला गुढी उभारण्याचा उपक्रम नियमित होत आहे. २०१३ च्या गुढीपाडव्यावेळी नववर्षशोभा यात्रेचे आयोजन करून यात्रेचे विसर्जन याठिकाणी गुढी उभारून करण्यात आले होते. या वेळी सदर पदाधिकारी व त्यांचे कुटूंबिय या सोहळ्यात सामील झाले होते. ग्रामस्थांच्या काही शंकांना उत्तरे देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मिटींगमध्ये देणगीदारांच्या नावाचा फलक व देणगीची रक्कम तसेच कोणत्या निधीतून सौंदर्यीकरण व दुर्गसृष्टी साकार झाली याविषयांची चर्चा झाली. त्याविषयांवर नंतर या किल्ले बांधणाऱ्या संस्थेने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे सदर मिटींगला उपस्थित राहिलेल्या ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

गेल्या काही वर्षांपासून सदर दुर्गसृष्टी उभारणाऱ्या संघटनेचे पदाधिकारी याठिकाणी फिरकेनासे झाले असून याठिकाणी जागता पहारा देण्याच्या उद्देश्याने कॅरम खेळणारे तरूण दिसून येऊ लागले, मात्र पर्यटकांना माहिती देण्यासाठी या तरूणांचा उपयोग होत नसे. पोलादपूरच्या स्वामी कवींद्र परमानंद समाधीस्थळाच्या परिसरात दुर्गसृष्टी उभारणाऱ्यांनी कोणत्याही प्रकारे देणग्यांचा हिशोब न ठेवता केलेला वारेमाप खर्च व आणि उधळपट्टी यामुळे हिशोब विचारणाऱ्यांना थेट छत्रपती शिवाजी महाराजांच्या कामाला विरोध करताय का, असा सवाल विचारून निरूत्तर करणाऱ्यांची जमात वाढली. पुढे हे सर्व राजकीय पक्षाचे कार्यकर्ते म्हणून नावारूपाला आहे. सध्या यापैकी काही आजी-माजी-विद्यमान नगरसेवक अथवा नगरसेवकांना कोणीही जाब विचारावा, अशी परिस्थिती राहिली नाही.

गेल्या चार-पाच वर्षांमध्ये या कवींद्र मठाचे सुशोभिकरण आणि प्रवेशद्वाराचे आधुनिक रूपडं भुरळ पाडणारे ठरले असले तरी अचानक अस्तंगत झालेली दुर्गसृष्टी आणि दुर्गसृष्टी उभारणारे सामाजिक कार्यात हिरिरीने सहभागी होणारे कार्यकर्त्यांचे या कवींद्र परमानंद मठातील कवींद्र परमानंद दुर्गसृष्टीसोबत गायब होणे अनेकांना हळहळण्यास कारणीभूत ठरत आहे.

कवींद्र मठाचे सुशोभिकरण पूर्ण केले तर मठाच्या ऐतिहासिक वारशाचे वलयही पुन्हा निर्माण होईल.



## बदलते तंत्रज्ञान

# क्यूआर कोड स्कॅन करताय? स्मार्टफोन हॅक होण्याची भीती



देशात क्यूआर कोडद्वारे पेमेंट करण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. यूपीआयवर आधारित पैसे देण्याची ही पद्धत लोकप्रिय ठरली. त्यामुळे साहजिकच सायबर भामटेदेखील याकडे वळले आहेत. बनावट क्यूआर कोड लावून लोकांचे स्मार्टफोन हॅक करण्याचे प्रमाण वाढले आहे. भारतासह अनेक देशांमध्ये हा धोका वाढला आहे.

स्कॅमर्स खऱ्या क्यूआर कोडऐवजी खोटा कोड चिकटवतात. त्यातून फोन हॅक केला जातो. सर्व माहिती हॅकर्सला मिळते आणि काही क्षणांत खाते रिकामे होते. एवढेच नव्हेतर, तुमच्या वैयक्तिक माहितीचा वापर करून ब्लॅकमेलदेखील केले जाते. यासंदर्भात एफबीआयने इशारा दिला आहे.

### क्रिप्टोविश्वातही स्कॅम

खोटे क्यूआर कोड क्रिप्टोकरन्सी उद्योगातही आहेत. क्रिप्टोमध्ये क्यूआर कोडद्वारे देवाणघेवाण होते. त्यामुळे स्कॅमर्सकडून हे क्षेत्र टार्गेट केले जाते.

### कसा होणार बचाव?

अज्ञात लोकांकडून मिळालेले क्यूआर कोड स्कॅन करू नका.कोड स्कॅन करताना वेब यूआरएल तपासून घ्या. कोड नीट पाहा. एखाद्या कोडला कव्हर केलेल्या स्टीकरसारखा वाटल्यास स्कॅन करू नका. क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर ऑटोमॅटिक लिंक ओपन करण्याचे सेटिंग बंद करा. क्यूआर कोडमधील चुकीचे अक्षर किंवा स्पेलिंगकडे लक्ष द्या.

### या देशांमध्येही धोका वाढला

भारत, अमेरिकेसोबतच जपान, फ्रान्स, जर्मनी, नेदरलँड इत्यादी देशांमध्ये क्यूआर कोड स्कॅमचा धोका वाढला. रेस्टॉरंट, कॅफे इत्यादी ठिकाणी क्यूआर कोड स्कॅन करून मेन्यू तुमच्या समोर येतो. पैसे देण्यासाठीही क्यूआर कोड असतो. मात्र, खऱ्याऐवजी स्कॅमर्स खोटा कोड लावतात. तो स्कॅन केल्यावर युझर्स ऑनलाइन मेन्यू किंवा पेमेंट चेकआउटवर नेण्याऐवजी फोनमध्ये मालवेअर टाकले जाते आणि त्यातून वैयक्तिक माहिती चोरली जाते.

### भारतात सर्वाधिक धोका

कोरोना काळात भारतात क्यूआर कोडचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. जागतिक टेक सपोर्ट स्कॅम अहवालानुसार, भारतीयांना तंत्रज्ञानाशी संबंधित वित्तीय फसवणुकीचा धोका खूप जास्त आहे. त्यातही तरुणांची फसवणूक होण्याची शक्यता जास्त आहे.

# क्रांतिकारक रासबिहारी बोस



**निमित्त**

रासबिहारी बोस हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक क्रांतिकारक देशभक्त होते. (२५ मे १८८६-२१ जानेवारी १९४५) विद्यार्थिदशेतच चंद्रनगरच्या तरुण क्रांतिकारी गटात हे सहभागी झाले. श्रीष घोष व अमरेंद्र चटर्जी यांनी त्याला क्रांतिदीक्षा दिली होती. मुलगा शिकत नाही म्हणून वडिलांनी त्याला पुढे सिमल्याला आणले. घरीच इंग्रजी व टंकलेखन शिकविले. दोन्हीत चांगली प्रगती झाल्यावर आपल्याच छापखान्यात चिकटवून दिले. स्वतंत्र वृत्ती व क्रांतीकडे ओढा असल्यामुळे घर सोडून दूर डेहराडूनला जंगल खात्यात रासबिहारींनी नोकरी धरली. १९०८ पासून १९१३ पर्यंत वारंवार रजा घेत असूनसुद्धा कशीबशी नोकरी टिकली. त्या वेळी बंगालच्या अनेक शहरांतून त्याचप्रमाणे बनारस, दिल्ली, लाहोर इ. शहरांतून क्रांतिगट कार्यरत होते.

प्रत्येक गटात एक तरी बंगाली असायचाच. त्यामुळे रासबिहारींना या सर्वांशी संबंध ठेवणे सुलभ गेले. १९१२ च्या मध्यास त्यांनी बंगाल-चंद्रनगरला जाऊन बाँब व बाँब साहित्य आणि अनेक तरुण क्रांतिकारक जमविले. बसंतकुमारला आपल्या घरी बरेच महिने ठेवून पूर्ण संधी दिली. बंगाली व पंजाबी क्रांतिकारी नेत्यांच्या सल्ल्याने व्हाइसरॉयवर बाँब टाकण्याची योजना आखली. बंसतकुमार तयार झाल्यावर त्यास लाहोरला धाडले. २२ डिसेंबरला लॉर्ड चार्ल्स हार्डिंग मोठ्या मिरवणुकीने दिल्ली येथे प्रवेश करून तेथे भारताची राजधानी सुरू करणार होते.

आदल्या दिवशी रासबिहारी डेहराडूनहून व बसंतकुमार लाहोरहून दिल्लीला आले. एका क्रांतिकारक मित्राकडे दोघेही उतरले. दुसर्या दिवशी हत्तीच्या अंबारीत दिमाखाने बसलेल्या व्हाइसरॉयसाहेबांवर बसंतने बाँब फेकला. हार्डिंगना गंभीर इजा झाली. पुढे रासबिहारींनी पुरविलेल्या बाँबच्या साहाय्याने व बसंतकुमारच्या मदतीने लाहोर गटाने खळबळ उडवली. पण पुढे दिल्ली कटाच्या खटल्यात बसंतकुमारसह चौघांना फाशी देण्यात आली.

गदर चळवळ १९१४ च्या महायुद्धानंतर सुरू झाली. गदर क्रांतिकारकांच्या हालचाली सॅन फ्रॅन्सिस्कोपासून पंजाबपर्यंत पसरल्या होत्या. विष्णुपंत पिंगळे बनारस गटाचे साह्य घेण्यासाठी रासबिहारींना बनारसलाच भेटले. ज्या पंजाबमध्ये मुख्य उठाव योजिला होता, तेथेच समर्थ नेतृत्वाची उणीव होती. पिंगळ्यांच्या विनंतीवरून रासबिहारींनी पंजाबच्या गदर उठावाची योजना तयार करण्याचे मान्य केले. अनेक भाषांवर प्रभुत्व, गुप्ततेच्या नियमांचे काटेकोर पालन, चाणाक्षपणा, हजरबाबीपणा आणि बेमालूम वेषांतरे करण्याची हातोटी असल्यामुळे ते पुढे काही महिने पंजाब, बनारस, चंद्रनगर येथे राहू शकले.

शेवटी जून १९१५ मध्ये ते जपानला पवननाथ टागोरांच्या पारपत्राच्या मदतीने निसटले. तेथेही युद्ध संपेपर्यंत त्यांनी क्रांतिकार्य चालू ठेवले होते. जपानी सरकारने त्यांना पकडण्याचे व ब्रिटिशांच्या हवाली करण्याचे हुकूम काढले. तेव्हा ते तेथेही अज्ञातवासात गेले. पुढे जपानी युवतीशी विवाह केल्यामुळे काही वर्षांनी म्हणजे १९२३ साली त्यांना जपानी नागरिकत्व मिळाले. पुढील १८-१९ वर्षे त्यांनी लेखन-भाषणाद्वारे हिंदी स्वांतत्र्याच्या प्रश्नावर जपानी जनतेमध्ये जाणीव निर्माण करण्याचा अखंड प्रयत्न केला. रासबिहारींचा तरुण मुलगा महासिदे जपानी फौजेत होता. त्याला ब्रिटिश सेनेशी झालेल्या लढाईत वीरमरण आले. दुसरे महायुद्ध चालू असतानाच त्यांनी देह ठेवला. त्यांची पत्नी शोभा व मुलगी टेटूकी पुढे जपानमध्येच स्थायिक झाल्या.

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : सायकलच्या पोंग्यासह कुल्फी.. कुल्फी असा संमिश्र आवाज नागाव, हटाळे, आक्षी परिसरात गेली पंचवीस वर्ष परिचित आहे. थंडगार कुल्फीने ऐन उन्हाळ्यात घश्याला पडलेली कोरड घालविणारा नागावचा 'बाळूकाका स्पेशल मलई कुल्फीवाला' नागावमधील लहान-थोरांचा जणू कुटूंब सदस्य झाला आहे.** (छाया : महेंद्र खैरे)

## आरोग्य प्रहर

# जाणून घ्या.. एक टूथब्रश साधारण किती वापरावा?



दात मजबूत करण्यासाठी लोक वेगवेगळे घरगुती उपायही करून पाहतात, पण एक चूक आपण सर्वजण करतो ती म्हणजे टूथब्रशचा दीर्घकाळ वापर करणे. आपण ते खराब होईपर्यंत आपण त्याचा वापर करतो.

दात उजळण्यासाठी अनेक जण आयुर्वेदिक टूथपेस्टचा वापर करतात. दात मजबूत करण्यासाठी लोक वेगवेगळे घरगुती उपायही करून पाहतात, पण एक चूक आपण सर्वजण करतो ती म्हणजे टूथब्रशचा दीर्घकाळ वापर करणे. आपण ते खराब होईपर्यंत आपण त्याचा वापर करतो.

दात आपल्या हसण्यात भर घालतात. त्यामुळे दात पांढरे आणि आकर्षक दिसण्यासाठी लोक वेगवेगळ्या गोष्टी करून पाहतात. दात उजळण्यासाठी अनेक जण आयुर्वेदिक टूथपेस्टचा वापर करतात. दात मजबूत करण्यासाठी लोक वेगवेगळे घरगुती उपायही करून पाहतात, पण एक चूक आपण सर्वजण करतो ती म्हणजे टूथब्रशचा दीर्घकाळ वापर करणे. आपण ते खराब होईपर्यंत आपण त्याचा वापर करतो.

जर तुम्हीही तसे करत असाल तर सावध राहा. एकच टूथब्रश बराच वेळ वापरल्याने तुम्हाला दातांच्या आणि तोंडाच्या समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच, आपण आपला टूथब्रश किती वेळा बदलता हे महत्वाचे आहे.

निरोगी दातांसाठी प्रत्येक व्यक्तीने ३ ते ४ महिन्यांनंतर आपला टूथब्रश बदलला पाहिजे. तथापि, याचा अर्थ असा नाही की आपण ब्रश तुटण्यासाठी किंवा ब्रिस्टल्स खराब होण्यासाठी ४ महिने थांबावे. जर आपला टूथब्रश आधीच खराब झाला असेल तर आपण तो त्वरित बदलला पाहिजे.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की ज्या लोकांच्या कुटुंबात कोणत्याही प्रकारची दातांची समस्या किंवा आरोग्याची समस्या आहे त्यांनी १ ते २ महिन्यांच्या आत आपला टूथब्रश बदलला पाहिजे.

टूथब्रशचे ब्रिस्टल दात स्वच्छ करण्यास आणि सूक्ष्म जीव काढून टाकण्यास मदत करतात. दीर्घकालीन वापरामुळे ब्रिस्टल्समध्ये अशक्तपणा येऊ शकतो, ज्यामुळे ते योग्यरित्या कार्य करू शकत नाहीत. बॅक्टेरियाच्या वाढीमुळे टूथब्रशवर बॅक्टेरिया, विषाणू आणि बुरशी इत्यादींची वाढ होऊ शकते. या जंतूंच्या वाढीमुळे तोंडात संसर्ग होऊ शकतो.

टूथब्रशचे ब्रिस्टल दात स्वच्छ करण्यास आणि सूक्ष्म जीव काढून टाकण्यास मदत करतात. दीर्घकालीन वापरामुळे ब्रिस्टल्समध्ये अशक्तपणा येऊ शकतो, ज्यामुळे ते योग्यरित्या कार्य करू शकत नाहीत. बॅक्टेरियाच्या वाढीमुळे टूथब्रशवर बॅक्टेरिया, विषाणू आणि बुरशी इत्यादींची वाढ होऊ शकते. या जंतूंच्या वाढीमुळे तोंडात संसर्ग होऊ शकतो.

# चौक हद्दीत वाकी नदीपात्रात अतिक्रमण

## मंडळ अधिकारी, तलाठ्याची कारवाई; शासनाकडून पंचनामा



**खोपोली : प्रतिनिधी**

एका धनिकाने तालुक्यातील आसरे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या वाकी नदीपात्रात जलसंपदा विभागाची कोणतीही परवानगी न घेता दगडी भिंतीचे बांधकाम केल्याचे उघड झाले झाले आहे. याबाबत मंडळ अधिकारी किरण पाटील आणि तलाठी अमोल बोराटे यांनी बुधवारी (दि. २४) प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली व पंचनामा केला.

वाकी नदीपात्राजवळ मुंबईतील धनिकाने नदीपात्रालगत दगडी भिंतीचे बांधकाम केले आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा लोंढा उजव्या बाजूकडे घुसून जांभिवली भागातील शेती पाण्याखाली जाणार आहे. शेतकरी गेले पाच महिन्यांपासून प्रशासन दरबारी खेटे मारत होते. अखेर चौक विभागाचे मंडळ अधिकारी किरण पाटील आणि तलाठी अमोल बोराटे यांनी अतिक्रमण असलेल्या ठिकाणी बुधवारी भेट दिली. पाटबंधारे विभागाने हे बांधकाम अनधिकृत असल्याचे मान्य केले आहे. याबाबत पाटबंधारे विभागाने तशी नोटीसदेखील पाठवली आहे.

**पंचनामाचे काम सुरू असून वस्तूस्थितीप्रमाणे अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवला जाईल.**

**–किरण पाटील,**
**मंडळ अधिकारी, चौक विभाग**

**प्रशासनाने अतिक्रमण असल्याचे मान्य केले असून देखील कारवाई होत नाही. आमची शेती डोळ्यांदेखत नष्ट होताना आम्ही पाहू शकत नाही. त्यामुळे उपोषणाची वेळ प्रशासनाने आमच्यावर येऊ देऊ नये.**

**–सुरेश गावडे,**
**शेतकरी, जांभिवली**


Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## MORU NARAYAN MHATRE VIDYALAYA, GAVHAN KOPAR

Plot No. : 1, Ulwe Node, At Post : GavhanKopar, Navi Mumbai - 410206

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2023-2024 (SELF FINANCE SCHOOL)**

**Full Time Asst. Teacher on Purely Temporary basis for the following subjects :-**

| Sr. No. | Section | Title Of Posts | Subject / Section | Qualifications | No Of Posts |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Primary | Asst-Teacher | Drawing | B.A. ATD (English) | 01 |

Applications with full details (Email address & whatsapp no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot No: 1, Ulwe Node, At Post : Gavhan-Kopar, Tal : Panvel, Dist : Raigad. 410206.**

Candidates may submit the application by email tomnmv.primary@gmail.com on or before 07/06/2023 (Wednesday).

If required **Contact No. 1. Mrs. Pranita Gole ( I/C Head Mistress) - 9137042080**
**2. Mrs. Chaitali Kadu – 9773323876.**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## BHGAUBAI CHANGU THAKUR COLLEGE OF LAW

Plot No. - 4, Sector - 11, Khanda Colony, New Panvel (w) 410206

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2023-2024 (SELF FINANCE)**

**Full Time Assistant Professors on Purely Temporary basis for the following subjects :-**

| Sr. No. | Section | Title Of Posts | Subject / Section | Qualifications | No Of Posts |
|---|---|---|---|---|---|
| 1 | L.L.B. | Asst. Professor | BLS, LL.B., LL. B (UG) | LLM. Ph.D NET/SET | 11 |
| | LL.M | Co-Ordinator | LL.M (PG) | LLM .Ph.D | 03 |
| | C.H.B. Staff | Asst. Professor | History | M.A. In History, NET/SET | 01 |
| | | | Political Science | M.A. In Political Science, NET/SET | 01 |
| | | | Economics | M.A. In Economics, NET/SET | 01 |
| | | | English | M.A. In English, NET/SET | 01 |
| | | | Logic | M,A. In Philosophy, NET/SET | 01 |
| | | | Sociology | M.A. / In Scoiology, NET/SET | 01 |

Applications with full details (Email address & whatsapp no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, at BHAGUBAI CHANGU THAKUR COLLEGE OF LAW Plot No- 04, Sector-11, Khanda Colony, New Panvel (W) Dist : Raigad. Navi Mumbai – 410206.**

Candidates may submit the application by email to **bcthakurcollegeoflaw@gmail.com** on or **before 07/06/2023** (Wednesday).

If required **Contact :- 1. Mrs. Dhanashree Kadam (I/C Principal) – 8689844671.**
**2. Mr. Hrishikesh Huddar - 9167529760.**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## CHANGU KANA THAKUR VIDYALAYA

Plot No.8 Sector - 14, New Panvel, Dist : Raigad – 410206.

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2023-2024**

**Full Time Asst. Teacher on Purely Temporary basis for the following subjects :-**

| Sr. No. | Name Of The Schools | Section | Title Of Posts | Subject / Section | Qualifications | No Of Posts |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Changu Kana Thakur Vidyalaya English Medium New Panvel. | Pre-Primary | Asst-Teacher | Pre-Primary | Graduate with E.C.C.Ed. | 01 |
| | | Primary | Asst. Teacher (On Leave Vacancy) | Primary | B.Sc. D.Ed. | 01 |
| | | Secondary | Asst. Teacher | Hindi & S.ST | B.A./ M.A. B.Ed | 01 |
| | | | | Science | B.Sc./ M.Sc. Maths / Physics / Chemistry / B.Ed. | 01 |
| 2 | Changu Kana Thakur Vidyalaya Marathi Medium New Panvel. | Secondary Section | Asst. Teacher | Sanskrit (Part Time) | B.A. B.Ed. (Sanskrit) | 01 |
| | | | | Drawing (Part Time) | Graduate With A.T.D. | 01 |
| 3 | Changu Kana Thakur Higher Secondary Vidyalaya, New Panvel. | Higher Seconary (Jr. College) | Asst. Teacher | Marathi | M.A. B.Ed. | 01 |
| | | | | English | M.A. B.Ed. | 01 |
| | | | | Mathematics | M.Sc. B.Ed. | 03 |
| | | | | Chemistry | M.Sc. B.Ed. | 01 |
| | | | | Geography | M.A.(English Medium) B.Ed. | 01 |
| | | | | Commerce | M.COM. B.Ed. | 01 |
| 4 | Counsellor | Changu Kana Thakur Vidyalaya, Campus New Panvel. | | Clinical psychology or Counsellor | | 01 |
| 5 | Yoga Teacher | | | Graduate with YOGA COURSE & Experience for atleast 2 Yrs. | | 01 |

Applications with full details (Email address & whatsapp no) should reach with attested xerox copies of certificates to **CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot no: 8, Sector-14, New Panvel. Tal: Panvel. Dist: Raigad. Navi Mumbai. 410206.**

Candidates may submit the application by email to **jbsp.interview@gmail.com** or by post on or before **07/06/2023 (Wednesday).** If required **Contact No. 9930718675. Mrs. Patankar Saylee**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## SMT. BHAGUBAI CHANGU THAKUR VIDYALAYA, DRONAGIRI

Plot No.60 / 61, Sector - 12, Tal : Uran, Dist: Raigad - 400 707.

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2023-2024. (SELF FINANCE SCHOOL)**

**Full Time Asst. Teacher on Purely Temporary basis for the following subjects :-**

| Sr. No. | Section | Title Of Posts | Subject / Section | Qualifications | No Of Posts |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | Asst-Teacher | Pre-Primary | Graduate with E.C.C.Ed. | 02 |
| 2 | Primary | Asst. Teacher | English | B.Sc. / B.A./ D.Ed. | 02 |
| | | | Maths | | |
| | | | Science | | |
| 3 | Upper Primary | Asst. Teacher | Science | B.Sc. / B.A. / B.Ed. | 01 |
| | | | Maths | | |
| | | | English | | |
| 4 | | Librarian | Graduate With B.Lib Or M.Lib. | | 01 |

Applications with full details (Email address & whatsapp no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot no: 60/61, Sector-12, Dronagiri Node, Tal: Uran, Dist: Raigad. 400707.**

Candidates may submit the application by email to **bctvidyalaya@gmail.com** on or before **07/06/2023 (Wednesday).**

If required **Contact No. 1. Mrs. Kathe Anuradha ( I/C Head Mistress) - 9819212918**
**2. Mrs. Patil Snehal - 9594964872**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## RAMSHETH THAKUR COLLEGE OF COMMERCE & SCIENCE

Plot No. - 1, Sector - 33, Kharghar, Navi Mumbai

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2023-2024 (SELF FINANCE)**

**Full Time Assistant Professors on Purely Temporary basis for the following subjects :-**

| Sr. No. | Section | Title Of Posts | Subject / Section | Qualifications | No Of Posts |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Science | Asst. Professors | Chemistry | M.Sc. NET/SET / Ph.D. | 04 |
| | | | Physics | M.Sc. NET/SET / Ph.D. | 01 |
| | | | Botany | | 02 |
| | | | Information Technology | M.Sc. MCA / NET / SET/ Ph.D. | 06 |
| 2 | Commerce | Asst. Professors | Commerce | M.Com. NET/SET/ Ph.D. | 04 |
| | | | Accounting & Finance | | 02 |
| | | | Business Economics | M.A. (Economics) NET/SET / Ph.D. | 01 |
| 3 | Science & Commerce | Asst. Professors | Mathematics | M.Sc. NET/SET / Ph.D. | 03 |
| 4 | B.M.S. | Asst. Professors | Management | M.Com. / M.B.A. / M.M.S. NET/SET / Ph.D. | 04 |
| 5 | Physical Director | | M.P.Ed. with NET/SET/ Ph.D | | 01 |
| 6 | Lab - Attendent | | B.Sc. | | 01 |

Applications with full details (Email address &whatsapp no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, at RAMSHETH THAKUR COLLEGE OF COMMERCE & SCIENCE, KHARGHAR. Plot No: 1, Sector -33, Kharghar. Tal : Panvel. Dist: Raigad. Navi Mumbai - 410210.**

Candidates may submit the application by email to **principalrtccs@gmail.com.** on or before **07/06/2023, (Wednesday).**

If required **Contact :- 1. MR. RUPENDRA GAIKWAD (PRINCIPAL) - 9423001141**
**2. MR. NITIN VASKAR - 9821967877**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

## RAMSHETH THAKUR SECONDARY & HIGHER SECONDARY VIDYALAYA

Plot No. -1, Sector - 33, Kharghar, Navi Mumbai

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2023-2024. (SELF FINANCE)**

**Full Time Asst. Teacher on Purely Temporary basis for the following subjects :-**

| Sr. No. | Name Of The Schools | Section | Title Of Posts | Subject / Section | Qualifications | No Of Posts |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Ramsheth Thakur Secondary Vidyalaya, Marathi Medium – Ovepeth Kharghar | Secondary Section | Asst-Teacher | Science | B.Sc. B.Ed. | 01 |
| 2 | Ramsheth Thakur Secondary & Higher Secondary Vidyalaya, Kharghar. | Jr. College Science & Commerce | Asst-Teacher | Chemistry | M.Sc. B.Ed. | 02 |
| | | | | Physics | M.Sc. B.Ed. | 02 |
| | | | | Biology | M.Sc. B.Ed. | 02 |
| | | | | Maths | M.Sc. B.Ed. | 02 |
| | | | | Geography | M.A. (Geo) B.Ed. | 01 |
| | | | | English | M.A. B.Ed. | 1.5 |
| | | | | Information Technology | MCA /M.Sc. (IT) M.Sc. C.S. B.Ed. | 02 |
| | | | | Economics | M.A.(Economics) B.Ed. | 01 |
| | | | | Book-Keeping & Accountancy | M.Com. B.Ed. | 01 |
| | | | | Organisation Of Commerce | M.Com. B.Ed. | 01 |
| | | | | Secreterial Practice | M.Com. B.Ed. | 01 |
| | | | | Hindi | M.A. B.Ed | 01 |
| | | | | Marathi | M.A. B.Ed. | 01 |
| | | | | Physical Educator (Part Time) | M.A. B.PEd. (Physical) | Part Time |

Applications with full details (Email address & whatsapp no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, at RAMSHETH THAKUR HIGHER SECONDARY VIDYALAYA, KHARGHAR. Plot No: 1, Sector -33, Kharghar. Tal: Panvel. Dist : Raigad. Navi Mumbai - 410210.**

Candidates may submit the application by email to **principalrthsv@gmail.com.** on or before **07/06/2023 (Wednesday)**.

If required **Contact : - 1. Mrs. Nisha Nair - ( I/C Principal) – 9987476532**
**2. Mrs. Kalyani Patil – 9870115721**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
**Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel**

# नवी मुंबईतील मैदानांची दुरवस्था

## खेळाडूंना अडथळा; डागडुजी करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिकेच्या माध्यमातून कोट्यवधी रुपये खर्च करून बेलापूर, नेरूळ, जुईनगर, सानपाडा अशा विविध विभागांमध्ये मुलांसाठी खेळाची मैदाने उभारली, मात्र त्या मैदानाकडे लक्ष नसल्यामुळे अनेक मैदानाची दुरवस्था झालेली आहे. जुईनगर सेक्टर २५ मध्ये खेळाडूंसाठी लाखो रुपये खर्चून उभारलेल्या मैदानाची वाट लागली आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने उत्कृष्ट मैदान तयार केले, मात्र या मैदानावर अनेक खेळाडू सराव करण्यासाठी येतात. या मैदानामध्ये मातीचे ढिगारे, कचरा, पडलेला असतो त्यामुळे खेळाडूंना अडथळा निर्माण होत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी तर या मैदानाचे खाजगीकरण सुरू असल्याचे निदर्शनास आले होते. पालिकेला कोणत्याही गोष्टीची पूर्वकल्पना न देता मैदानात खोदकाम करून मोबाईल टॉवर उभारण्याचे स्वप्न काही जण पाहत असल्याचे समोर आले. त्यामुळे पालिकेचे हे मैदान रामभरोसे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. बाजूलाच पालिकेने उभारलेले उद्यान आहे, त्यात मुलांच्या शाळेना सुटी असल्यामुळे मुले मैदानात आवर्जून खेळायला येतात, मात्र या मैदानाचे गेटदेखील तुटलेले आहेत.



मुलांनी मैदानी खेळ खेळायचे सोडून मैदानातील समस्यांचाच सामना करावा लागत आहे. क्रिकेट कबड्डी, खो-खो मुले आवडीने खेळतात. मैदानातील मातीचे ढीग खोदकाम, कचरा, यामुळे मुलांमध्ये नाराजगी निर्माण झाली असून पालिकेचे अधिकारी लक्ष देत नाही त्यामुळे विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे.

नेरूळमधील सेक्टर १२ येथील रामलीला मैदानात तर वर्षभर विविध सार्वजनिक कार्यक्रम सुरू असतात मुलाना मैदानी खेळ खेळण्यासाठी हे हक्काचे मैदान असताना इथ नवी मुंबई मनपा विविध जाहीर कार्यक्रम घेण्यासाठी परवानगी देते कशी, असा संतप्त सवाल क्रीडाप्रेमी विचारता आहेत सतत काही ना काही कार्यक्रम सुरू असल्यामुळे क्रिकेट कबड्डीसारखा मैदानी खेळ खेळण्यासाठी क्रिडा आयोजकांनी अडथळे निर्माण होतात. नेरूळ सेक्टर २४ मध्ये नेरूळ गावातील खेळाडूंनी एकत्र येऊन श्रमदानातून खेळाचे मैदान विकसित केले आहे, मात्र तिथे काही डेब्रिज माफिया रात्रीच्या वेळी सर्रास डेब्रिज टाकत असून खेळाडूंनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

### कार्यक्रमासाठी खोदकाम

सीबीडी सेक्टर १ मधील सुनील गावस्कर मैदान खेळासाठी निर्माण केले आहे की, विविध उत्सव, जयंतीसाठी आहे तेच समजत नाही. या ठिकाणी विविध संस्था आपले जाहीर कार्यक्रम घेतात त्यानंतर खुदाई केलेली ठिकाण जैसे थे ठेऊन जात असून मनपा अधिकारी या बाबीकडे दुर्लक्ष करीत असतात जाहीर कार्यक्रमासाठी खोदलेले खड्डे त्याच स्थितीत ठेवले गेल्याने आम्ही क्रिकेट खेळ कसे खेळणार, असा सवाल क्रिकेट खेळाडू विचारतात.

# सर्वेक्षणाद्वारे धोकादायक ५२४ इमारतींची यादी जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतींचे सन २०२३-२०२४ या वर्षासाठी विभागवार सर्वेक्षण करण्यात आले असून सर्वेक्षणानंतर महापालिका क्षेत्रात एकूण ५२४ इमारती महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम २६४ अन्वये धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.

यामध्ये, अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तत्काळ निष्कासित करणे अशा 'सी-१' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ६१ इमारती तसेच इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरूस्ती करणे अशा 'सी-२ ए' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ११४ इमारती आणि इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरूस्ती करणे अशा 'सी-२ बी' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ३०० इमारती त्याचप्रमाणे इमारतीची किरकोळ दुरूस्ती या 'सी-३' प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या ४९ इमारती, अशाप्रकारे एकूण ५२४ धोकादायक इमारतींची यादी घोषित करण्यात आलेली आहे.

ही यादी नवी मुंबई महापालिकेच्या www.nmmc.gov.in या वेबसाईटवर 'विभाग' सेक्शनमध्ये 'अतिक्रमण विभाग' माहितीच्या सेक्शनमध्ये अवलोकनासाठी सहज उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या यादीमध्ये अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करण्याच्या 'सी-१' प्रवर्गामध्ये नमूद ६१ इमारतींची नावे व तपशील नागरिकांना सहज कळावा यादृष्टीने ठळक अक्षरात प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम २६४ मधील तरतुदीच्या अनुषंगाने नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार घोषित इमारतींमध्ये वास्तव्य करणारे मालक अथवा भोगवटादार यांना ते राहत असलेली इमारत निवासी अथवा वाणिज्य वापराकरिता धोकादायक असलेबाबत आणि या इमारतींमधील निवासी अथवा वाणिज्य वापर तात्काळ थांबविणेबाबत तसेच धोकादायक इमारतींचे बांधकाम विनाविलंब तोडून टाकणेबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील ५ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार लेखी सूचना अथवा नोटीस देण्यात आलेल्या आहेत. 'सी-१' प्रवर्गातील इमारतीची विद्युत व जलजोडणी खंडीत करण्यात येईल, असेही यात स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

धोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतींचे मालक अथवा भोगवटादार यांनी ते रहात असलेल्या इमारतीचा वापर करणे धोकादायक असल्याने इमारत कोसळून जिवीत व वित्तहानी होण्याचा संभव लक्षात घेऊन या इमारतीचा अथवा बांधकामाचा निवासी अथवा वाणिज्य वापर त्वरित बंद करावा आणि ही इमारत अथवा बांधकाम विनाविलंब तोडून टाकावे, असे सूचित करण्यात आलेले आहे. अशा प्रकारची कार्यवाही न केल्यास, इमारत कोसळल्यास होणाऱ्या नुकसानीस फक्त संबंधित जबाबदार असतील, नवी मुंबई महापालिका यास जबाबदार राहणार नाही, असे स्पष्टपणे सूचित करण्यात आलेले आहे.

या नोटिसीमध्ये धोकादायक इमारतींच्या नावासमोर रहिवास वापर सुरू आहे अथवा नाही याचीही नोंद करण्यात आलेली आहे. इमारतीच्या वर्गीकरणानुसार इमारतींचा भोगवटा वापर अथवा रहिवास करणाऱ्या नागरिकांनी इमारत तात्काळ निष्कासीत करावयाची आहे किंवा वर्गीकरणानुसार नमूद केल्याप्रमाणे इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरुस्ती करणे प्रवर्गामध्ये मोडणाऱ्या भोगवटाधारकांनी इमारत दुरुस्त करून आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. याबाबत कोणतीही धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास त्यास पालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.



### रहिवास तत्काळ थांबविण्याचे आदेश

पावसाळा कालावधीत धोकादायक झालेल्या इमारतींचा अथवा घरांचा वापर करणे धोक्याचे आहे. त्यामुळे जिवित व वित्तहानी होऊ शकते. म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा अथवा घरांचा रहिवास अथवा वापर तत्काळ थांबविण्यात यावा असे आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे, अन्यथा दुर्देवीरित्या अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधिताची राहील याची नोंद घ्यावी, असे पालिकेने म्हटले आहे.

# सारसोळे डेपोच्या प्रवेशद्वारावर कचऱ्याचे ढीग; प्रवाशांकडून संताप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपाच्या वतीने विभागातील कचराकुंड्या हटविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांकडून सारसोळे बस डेपोच्या प्रवेशद्वारासमोर चक्क रस्त्यावर कचरा टाकला जात आहे. या कचऱ्यांच्या ढिगामुळे सारसोळे बस डेपो सह परिसराला बकालपणा आला आहे.

पालिकेने कचरा कुंडीमुक्त शहर करण्याचा पूर्णपणे प्रयत्न करत असताना दुसरीकडे सुशिक्षित नागरिक रस्त्यावर, फुटपाथवर, बस डेपोच्या प्रवेशद्वार, उद्यानातील गेट समोर जिथे जागा मोकळी दिसेल तिथे कचरा फेकत असतात. हा कचरा ओला सुका कचरा एकत्र असल्यामुळे याचा उग्र वास येत असून मच्छर तयार होतात, चाचण घोंगावते, त्यामुळे बस डेपो मध्ये आलेल्या प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. बसची वाट पाहत बसलेल्या प्रवाशांना नाक मुठीत धरून बसावे लागत आहे.

सारसोळे डेपोच्या प्रवेशद्वारावर कचऱ्याचे ढीग पाहता स्वच्छ सर्वेक्षणाला तिलांजली दिल्याचा प्रकार पाहायला मिळत आहे. नेरूळ परिसरामध्ये कचऱ्याची समस्या खूप गंभीर बनत चालली आहे. अशातच महापालिकेने स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत प्रत्येक नोड मधून कचराकुंड्या हटवल्या आहेत. त्यामुळे काहीजण रस्त्यावरच कचरा टाकण्याचे प्रकार सर्रास पणे घडत आहे. सारसोळे बस डेपोच्या प्रवेशद्वारावर कचऱ्याचे ढीग हे स्वच्छ सर्वेक्षणामध्ये अडथळा निर्माण करण्याचे काम होत आहे. एकीकडे नवी मुंबई शहराला रंगरंगोटीने सजवले जात आहे, तर दुसरीकडे डेपोच्या बाहेर गेटवरच मोठ मोठे कचऱ्याचे ढीग साचलेले पाहायला मिळतात.

### स्वच्छता करण्याची मागणी

*कचऱ्याच्या ढिगांमुळे सारसोळे बस डेपोसह नवी मुंबई शहरालादेखील बकालपणा आला असल्याचे पहायला मिळत आहे तसेच बस डेपोमध्ये येणाऱ्या महिला नागरिक लहान मुलांसह नाराजी व्यक्त केली जात असून पालिकेच्या वतीने लवकरात लवकर नेरुळमधील सारसोळे डेपोच्या प्रवेशद्वारासमोरील कचऱ्याचे ढीग उचलवून इथे कचराकुंड्या हटविल्याच्या पाट्या लावाव्यात, अशी मागणी सारसोळे डेपोमध्ये येणाऱ्या प्रवाशांनी केली आहे.*



# शॉर्टसर्किटमुळे आग लागून दुकान खाक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सानपाडा सेक्टर ५मधील डेकोरेशनचे साहित्य व मोबाईल ॲक्सेसरीज असलेल्या दुकानाला मंगळवारी (दि.२३) दुपारी आग लागली होती. या दुर्घटनेत कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाली नसली तरी दुकानातील सर्व साहित्य जळून खाक झाले.

सानपाडा सेक्टर-५ मधील प्रमिला पॅलेस या इमारतीत असलेल्या डेकोरेशनचे साहित्य मोबाईल विक्रीच्या दुकानामध्ये दुपारी १२च्या सुमारास आग लागली. यावेळी दुकानातील कर्मचाऱ्यांनी तत्काळ बाहेर पळ काढला. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले होते. त्यामुळे बाजूच्या दुकानांनाही त्याचा फटका बसला. आगीची माहिती मिळताच वाशी येथील महापालिका अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. जवळपास तासाभराच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात आली असून शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# गोरगरीब रुग्णांच्या आरोग्याला पालिका देणार बळ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

तुर्भे येथील हनुमान नगरमध्ये पालिकेकडून आरोग्यवर्धिनी केंद्र उभारले जात आहे. यासाठी महापालिकेने तयारी सुरु केली असून तुर्भेतील हनुमान नगर येथील जुन्या अंगणवाडी शाळेच्या इमारतीमध्ये हे केंद्र सुरू केले जाणार आहे. यासाठी इमारतीची दुरुस्ती तसेच नूतनीकरण केले जात असून या केंद्रामुळे विभागातील गोरगरीब रुग्णांना फायदा होणार आहे.

तुर्भेमधील बहुतांश परिसर हा झोपडपट्टी आणि एमआयडीसी विभागात मोडतो. या परिसरातील नागरिकांना उपचारासाठी तुर्भे गावातील माताबाल रुग्णालयात यावे लागते. नाहीतर थेट वाशीच्या पालिका रुग्णालयात जावे लागते. त्यामुळे नवी मुंबई महापालिका



हद्दीतील सात ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार कुकशेत गाव, कोपरखैरणे मध्ये तीन ठिकाणी, बेलापूरमध्ये तीन आणि दिवा किंवा रबाळे परिसरात ही आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू केली जाणार आहेत. या केंद्रामध्ये आवश्यक सर्व आरोग्य सुविधा देण्यात येणार असून रुग्णांना वेळेवर वैद्यकीय निदान होऊन उपचार घेणे सोईस्कर होणार आहे.

### लोकसंख्येच्या तुलनेत सुविधांचा अभाव

सध्या महापालिका हद्दीत वाशीत प्रथम संदर्भ रुग्णालय, नेरूळ, ऐरोली येथे प्रशस्त माताबाल रुग्णालय आहेत. तुर्भे, ऐरोली येथेही माताबाल रुग्णालय आहेत. याशिवाय २३ ठिकाणी आरोग्य केंद्र उभारण्यात आलेली आहेत. शहराची वाढती लोकसंख्या पाहता पालिकेच्या आरोग्य व्यवस्थेवर ताण येत असल्याचे अनेकदा समोर येते.

### साथीचे आजार रोखण्यासाठी मदत

पावसाळ्यात साथीचे आजार बळावल्यावर आरोग्य व्यवस्था अपुरी पडू लागते, मात्र या आरोग्यवर्धिनी केंद्रामुळे स्थानिक गावठाण, झोपडपट्टी अशा भागात आरोग्य सुविधा नागरिकांना घराशेजारी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे आरोग्य सुविधांचे जाळे आणखी घट्ट होण्यास मदत होणार आहे. नागरी आरोग्य केंद्राप्रमाणेच हे आरोग्य केंद्र असणार असून त्याचप्रमाणे आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत.

**सध्या तुर्भे हनुमान नगर येथील बंद अंगणवाडीच्या इमारतीमध्ये हे आरोग्यवर्धिनी केंद्र सुरू केले जाणार आहे. त्याच्या डागडुजीसाठी पालिकेने निविदा मागवली असून त्यासाठी १४ लाख पाच हजार १६२ इतके पैसे खर्च केले जाणार आहेत.**

**-डॉ. प्रमोद पाटील,** मुख्य वैद्यकीय अधिकारी

# मित्राच्या स्मृतीप्रित्यर्थ स्तुत्य उपक्रम

## नेरूळमध्ये रक्तदान, अन्नदान

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळमधील स्व. रोशन राजेंद्र बारवे याचे कोविड काळात निधन झाले होते. आपल्या परिवारातील एक मित्र कोरोना काळात गमावल्याने सर्व मित्रांनी एकत्र येत प्रत्येक पुण्य स्मरणदिनानिमित्त स्माजिक उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला. सलग तीन वर्षे रक्तदान, अन्नदान, दिवाळी फराळ वाटप, लहान मुलांना खाऊचे वाटप असे सामाजिक करत आपल्या मित्राच्या आठवणीत करण्यात येत आहे.

२३ मे २०२० रोजी रोशन बारवे या तरुणाचे कोरोनाकाळात दुःखद निधन झाले आहे. रोशनच्या अचानक जाण्याने त्याच्या कुटुंबीयांसह मित्र परिवाराला मोठा धक्का बसला. आज प्रत्यक्षात मित्र नसला तरी त्याच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रतिवर्षी २३ मे रोजी स्व. रोशन बारवे मित्र परिवाराकडून त्याला सामाजिक कामातून आदरांजली वाहण्यात येते. यंदाच्या तृतीय पुण्यस्मरण निमित्तदेखील सर्व कुटुंबीय, मित्रांनी सानपाडा येथील केमिस्ट भवन येथे रक्तदान केले. फुल ना फुलाची पाकळी या उक्तीप्रमाणे ३५ बाटली रक्तदान यावेळी जमा झाले.

यासोबत नेरूळ सेक्टर १९ येथील गुरुद्वारा येथे लंगर वेळी जमा आर्थिक ७६०० या रकमेतून अन्नदान करण्यात आले. या वेळी उपस्थित मित्रांनी आपल्या मित्राच्या आठवणींना उजाळा देत सोबत नसल्याची खंत व्यक्त केली.



# नोकरीचे प्रलोभन दाखवून अनेक तरुणांना गंडा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शिपिंगमध्ये नोकरीस इच्छुक असलेल्या बेरोजगार तरुणांना परदेशात नोकरी मिळवून देण्याचे प्रलोभन दाखवून एका टोळीने लाखो रुपये उकळून पलायन केल्याचे उघडकीस आले आहे. या याप्रकरणी एपीएमसी पोलिसांनी फसवणुकीसह बनावटगिरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आलेल्या टोळीमध्ये अजहर एस. मुल्ला, अंकिता, आशिका व शिवम या चौघांचा समावेश आहे. या टोळीने एपीएमसीतील पामबीच लगत फ्युचरिक मेरिटाईम नावाने कार्यालय थाटले होते. त्यानंतर या टोळीने मरिन अकॅडमीचे शिक्षण पूर्ण केलेल्या तरुणांना संपर्क साधून त्यांच्यासाठी नोकरीची संधी उपलब्ध असल्याचे सांगत ३ ते ४ लाख रुपये भरावे लागतील, असे सांगितले होते. या प्रकरणात देशभरातील तरुणांना कोट्यवधीचा गंडा घातल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# बांधकाम व्यावसायिकाची फसवणूक

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत आहे. या अतिक्रमणावर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून दंडात्मक कारवाई केली जात आहे.

घणसोली विभागात रोज नवनवीन कारवाया होत असून महापालिकेच्या वतीने सोमवारी दुपारी कोपरखैरणे रेल्वे स्टेशनहुन घणसोली विभागात प्रवेश करणाऱ्या रस्त्यावर अडवणूक करणाऱ्या विकासकांवर कारवाई करण्यात आली. यामध्ये एकूण तीन विकासकांनी कोणतीही परवानगी न घेता रास्ता हडपल्याने महापालिकेने कारवाई करत प्रत्येकी ५० हजार असा दीड लाखांचा दंड ठोठावला आहे.

# नाका कामगार उपेक्षितच!

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

हातावरचे पोट असणाऱ्या नाका कामगारांकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष होत आहे. नवी मुंबई शहरातही चाळीस टक्के कामे नाका कामगारांकडून केली जातात, मात्र दस्तावेजांअभावी असंघटीत कामगारांच्या विविध योजनांचे लाभ मिळत नसल्याने नशिबी उपेक्षिताचे जगणे आले आहे.

नवी मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात स्थलांतरित लोकांचे वास्तव्य आहे. यात फक्त राज्यामधूनच नाही तर कर्नाटक, बिहार, उत्तर प्रदेश आणि इतर राज्यातून हजारोंच्या संख्येने नागरिक कामाच्या शोधात स्थलांतर करतात. अशातच नवी मुंबई शहरांमध्ये बांधकाम क्षेत्रात काम मिळत असल्यामुळे हजारोच्या संख्येने नाका कामगार काम करत आहेत. यामध्ये ऐरोली, नोसील नाका, कोपरखैरणे, तुर्भे, वाशी नाका, वाशी डेपो, नेरूळ नाका, रबाळे झोपडपट्टी, दिघा, करावे, सानपाडा, बेलापूर अशा



विविध नाक्यावर प्रत्येकी तीनशे नाका कामगार कामाच्या शोधात उभे असतात. काम मिळाले तर पैसा, नाहीतर सुटी असा नियमच या कामगारांना लागू झाला असून दस्तावेजांअभावी असंघटित कामगारांच्या योजना लागू होत नसल्यामुळे शासनाच्या कल्याणकारी योजनांपासूनदेखील वंचित राहण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

कुटुंब तसेच स्वतःचे पोट भरण्यासाठी कोणत्याही प्रकारचे काम करण्याची तयारी त्यांची असते. त्यामुळेच सुरक्षा असो किंवा नसो काम करण्याची मानसिकतेमुळे त्यांचे आर्थिक शोषण होत आहे.

स्मार्ट सिटीतील नाक्यांवर, दगड खाण, बिगारी अशा क्षेत्रातील कामगार बारा-बारा तास राबतात. असंघटित असल्यामुळे त्यांच्या या श्रमाला मोल नसते. कंत्राटदार पगार रखडवतो. वर्षानुवर्षे पगारवाढ मिळत नाही. राहण्यासाठी काहीजण पदपथांचा आसरा घेतात.

**नवी मुंबईतील नाका कामगारांना निवारा शेड, त्यांच्या पाल्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तसेच सामाजिक विभागाकडून त्यांना सुविधा मिळवून देण्यासाठी सकारात्मक आहोत**

**-डॉ. श्रीराम पवार,** उपायुक्त, समाज कल्याण विभाग, महापालिका

# पेण-खोपोली मार्गावर टेम्पोची दुचाकीला धडक



**एकाचा मृत्यू; महिला गंभीर जखमी**

**पेण : प्रतिनिधी**

खोपोली-महामार्ग मार्गावर सावरसई गावाजवळ सीएनजी गॅस टेम्पो व पॅशन प्रो दुचाकीचा भीषण अपघात होऊन या अपघातात दुचाकीचालकाचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांची पत्नी गंभीर जखमी झाली आहे. हा अपघात सोमवारी (दि. २३) दुपारी २:३० वाजण्याच्या दरम्यान घडला.

निलेश दाजी मोरे (वय ४५) व निकिता निलेश मोरे (वय ४२, रा. आराव) हे दोघेही दुचाकी(एमएच ०६ बीबी ८६५९)वरून पेण ते आराव असा प्रवास करीत असताना सावरसई गावाजवळील अवघड वळणावर महानगर गॅस टेम्पोचालकाचा (एमएच ४३ बीएक्स ३११५) वाहनावरील ताबा सुटल्याने समोरून येणाऱ्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या धडकेत निलेश मोरे यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्याची पत्नी निकिता मोरे ही गंभीर जखमी झाली आहे.

कल्पेश ठाकूर यांनी रुग्णांना आपल्या रुग्णवाहिकेतून तत्काळ पेण उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, तसेच पुढील उपचारासाठी एमजीएम कामोठे येथे पाठविण्यात आले. रायगड वाहतूक पोलीस व पेण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी दाखल होत दोन्ही वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

## कृषी निविष्ठा तक्रारींसाठी भरारी पथके स्थापन

**अलिबाग** : जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा तक्रारीबाबत धडक मोहीम राबविण्याकरिता रायगड जिल्ह्यात सन२०२३-२४साठी जिल्हास्तरीय भरारी पथकाची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी दिली आहे.

जिल्हास्तरावर नियुक्त केलेली ही भरारी पथके कृषी निविष्ठांच्या गुणवत्ता नियंत्रणाचे काम शासनाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे करणार असून या पथकामध्ये प्र.कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद रायगड मिलिंद चौधरी, पथक प्रमुख (८९८३५११३५९), उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे सदस्य (९८२२७६९६१७), प्र. उपविभागीय कृषी अधिकारी खोपोली अर्चना सूळ सदस्य (८९७२१९७०६०), प्र. उपविभागीय कृषी अधिकारी माणगाव आनंद कांबळे सदस्य (९४२३०४९६७८), प्र.उपविभागीय कृषी अधिकारी महाड दत्तात्रय काळभोर सदस्य, (९५६१५०९०८९), मोहीम अधिकारी जिल्हा परिषद मिलिंद चौधरी, निरीक्षक वैद्यमापनशास्त्र बी. आर. चव्हाण सदस्य (९९३०५४७०९५), जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक गोरक्षनाथ मुरकुटे सदस्य सचिव (९५०३१७५९३४) यांचा समावेश आहे.

## नागोठणे जिंदाल हॉस्पिटलमध्ये उद्या दंतरोग शिबिर

**नागोठणे** : सुकेळीजवळील बी. सी. जिंदाल चॅरिटेबल हॉस्पिटलच्या सौजन्याने सुकेळी ऐनघर पंचक्रोशीतील नागरिकांसाठी शुक्रवारी (दि. २६) दंतरोग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भरवण्यात येईल. शिबिरात उपस्थित दंत रोग चिकित्सक दंतरोग बाधीत रुग्णांची तपासणी करून उपचार, बाधित रुग्णांना मोफत व अर्ध्या किमतीत औषधोपचार देण्यात येतील. पंचक्रोशीतील नागरिकांनी दंतरोग शिबिरासाठी उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

वाहतूक पोलिसांनी मंगळवारी (दि. २३) जिल्ह्यात विविध ठिकाणी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३४२ चालकांवर कारवाई करूनन २,१३,७५० रुपये दंड आकारला आहे, अशी माहिती देण्यात आली.


### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक २२/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | रानसाई पाणी पुरवठा योजना...... रानसाई पाणी पुरवठा योजनेची जलशुद्धीकरण केंद्र रानसाई ते एचएसआर पर्यंतची व एचएसआर ते दास्तान दरम्यानची अस्तित्वातील ९०० मि.मी. व्यासाची मृदू पोलादी शुद्धजल गुरुत्व वाहिनी, ९०० मिमी व्यास आणि १० मिमी जाड मृदु पोलादी जलवाहिनीने बदलणे. | ₹ ३३,१५,२१,४२३.०० |
| २. | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी संकलन वाहिनीमधील चोकअप काढून टाकणे तसेच चेंबर साफ करणे. (वार्षिक तत्वावरील देखभालीचे काम) | ₹ २६,६०,९०८.०० |

उपरोक्त अ.क्र. १ वरील कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २५/०५/२०२३ ते दिनांक १९/०६/२०२३ पर्यंत व अ.क्र. २ वरील कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २५/०५/२०२३ ते दिनांक ०८/०६/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी अ.क्र. १ वरील कामाबाबत दिनांक ०१/०६/२०२३ पूर्वी व अ.क्र. २ वरील कामाबाबत दिनांक २९/०५/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा अ.क्र.१ वरील कामाबाबत दिनांक ०७/०६/२०२३ पासून व अ.क्र. २ वरील कामाबाबत दिनांक ०१/०६/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



### पनवेल महानगरपालिका, पनवेल

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

फेर ई- निविदा सुचना

पनवेल महानगरपालिकेच्या परिसरात सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर एसएससी शी संलग्नता अंतर्गत इंग्रजी माध्यमाची शाळा चालवण्यासाठी एजन्सीची नियुक्ती बाबत या कामाची फेर ई - निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल कडून मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. संबंधित निविदा धारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

पमपा/शिक्षण/निविदा/२१४/२०२३
दिनांक: २४/०५/२०२३

सही/-
(विठ्ठल डाके)
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

### CHANGU KANA THAKUR ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE (AUTONOMOUS)

Plot No: 1, Sector - 11, Khanda Colony, New Panvel (W) Dist: Raigad. Tal : Panvel - 410206.

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS (SELF FINANCE)**

**Full time Assistant-Professor for the Academic Year 2023-2024, On Purely Temporary basis for the following subjects :-**

| SR NO. | POST | SUBJECT | EDUCATIONAL QUALIFICATIONS | NO OF POSTS |
|---|---|---|---|---|
| 1 | | MICROBIOLOGY | M.Sc.(Microbiology) with NET /SET/Ph.D. | 05 |
| 2 | | ZOOLOGY | M.Sc.(Zoology) with NET /SET/Ph.D. | 04 |
| 3 | | BOTANY | M.Sc, ( Botony) with NET/SET/Ph.D. | 01 |
| 5 | | CHEMISTRY | M. Sc. (Chemistry) with NET /SET/Ph.D. | 04 |
| 6 | | BIOTECHNOLOGY | M.Sc.(Biotechnolgy) NET /SET/Ph.D. | 04 |
| 7 | | MATHEMATICS | M.Sc.(Mathematics) NET /SET/Ph.D. | 03 |
| 8 | | INFORMATION TECHNOLOGY | M.Sc.( Comp. Sci./ Information Technolgy MCA/ MCM) with NET /SET/Ph.D. | 11 |
| 9 | | COMPUTER SCIENCE | M.Sc.( Comp. Sci./ Information Technolgy MCA/ MCM) with NET /SET/Ph.D. | 11 |
| 10 | | COMMERCE | M.COM with NET/SET/ Ph.D. | 03 |
| 11 | | ACCOUNTING & FINANCE | M. Com. ( A & F), with NET\SET\Ph.D. | 06 |
| 12 | | BMS | MMS/ MBA with NET\ SET\Ph.D. | 06 |
| 13 | | ACCOUNTANCY | M.COM (Accountancy) with NET\SET\Ph.D. | 01 |
| 14 | | F. C. | M. A.(Social Science) with SET/NET/ Ph. D. | 01 |
| 15 | | HISTORY | M. A. ( History) with NET\ SET\Ph.D. | 01 |
| 16 | | ENGLISH | M.A. ( English) with NET\SET\ Ph.D. | 02 |
| 17 | ASST. PROFESSORS | POLITICAL SCIENCE | M. A. ( Political Science) with NET\ SET\Ph.D. | 01 |
| 18 | | ECONOMICS | M.A. ( ECO) NET\SET\ Ph.D. | 02 |
| 19 | | PHYSICAL EDUCATION | M.P.Ed. with NET\ SET\Ph.D. | 02 |
| 20 | | N.C. C. | Any Post Graduate & C- Certificate Holder with NET/SET. | 01 |
| 21 | | N.S.S | M. A.(Social Science/Political Science) with SET/NET/ Ph. D. | 01 |
| 22 | | CO- ORDINATOR CULTURAL ACTIVITIES | M. A. (Sangeet Visharad) with SET/NET/ Ph.D. | 01 |
| 23 | | COUNSELLOR | Clinical Psychology or Equivalent | 01 |
| 24 | | CO-ORDINATOR DR. C. D. DESHMUKH CENTRE-ADMINISTRATIVE SERVICE | A post graduate, experience in teaching at service commission coaching classes will be prefered OR persons from Government offices / education competitive exam coaching institutions can also apply | 01 |
| 25 | | CO-ORDINATOR SCIENCE RESOURCE CENTER | Techician having knowledge of maintenance and handling the sophisticated instrument like UV visible, Spectrophotometer, FTIR, AAS, GC etc. | 01 |
| 26 | | TRAINING & PLACEMENT OFFICER | M.B.A. / M.M.S / HR or Equivalent having an experience in Traning and Placement. | 01 |
| 27 | | DATA OPERATOR | M.Sc. (IT)/ Computer Science having experience of maintaining the Website. | 01 |
| 28 | | Asst. Professor cum Co-Ordinator | M.Sc. In Fashion Design | 01 |
| | | | B.Sc. In Fashion Design (CHB) | 01 |
| 29 | | Asst. Professor cum Co-Ordinator | M.Sc. In Interior Design | 01 |
| | | | B.Sc. In Interior Design (CHB) | 01 |

Applications with full details (Email address & whatsapp no) should reach with the attested xerox copies of certificates to **"CHAIRMAN" J.B.S.P. SANSTHA'S, CHANGU KANA THAKUR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, Plot No: 1, Sector-11, KHANDA Colony, New Panvel (W) - 410 206.**

Candidates may submit application by email to **principal@ckthakurcollege.net** on or before **07/06/2023 (Wednesday).** If required **Contact : Mr. Pralhad Thakur - 9022600288**

**Shri. Ramsheth Thakur (Ex-M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel



### निविदा सूचना

**यशोमंगल सहकारी गृहनिर्माण संस्था पुनर्विकास योजना**

प्रस्तावित सहकारी संस्था इमारत पुनर्विकास योजने अंतर्गत अनुभवी, सक्षम व योग्य विकासकांकडून जुनी इमारत पाडून पनवेल महानगरपालिकेचे नियमांना अधीन राहून नवीन इमारत बांधणेसंबंधी निविदा मागविणेत येत आहेत.

**१) संस्थेचे नाव** : **यशोमंगल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पनवेल,**
**२) संस्थेचा पत्ता** : **मालमत्ता क्र. ६३२, ६३३, ६३३/१, डॉ. पटवर्धन मार्ग, जुन्या पोस्टाजवळ, पनवेल. जि. रायगड, ४१०२०६**
**३) संस्था नोंदणी क्र.** : (Regd. No. RGD/PWL/HSG/TC/1371/1996-1997) **दि.०४/१०/१९९६**
**४) भुखंडाचे वर्णन** : **मालमत्ता क्रमांक ६३२, ६३३ व ६३३ हिस्सा १ या (०३)** तीन रहीवासी भुखंड मिळकतींचे **एकुण क्षेत्र १७४७.४० चौ. मी.**
**५) अस्तित्वात असलेल्या इमारतीतील सदनिका/गाळयांची संख्या** : ५८ सदनिका व २० गाळे.
**६) जुनी इमारत पूर्णत्वाची तारीख** : दिनांक ०७/११/१९८८.
**७) निविदा उपलब्धता** : सदर संस्थेच्या निविदा दि. २५/०५/२०२३ ते ०३/०६/२०२३ चे दरम्यान (सुटीचे दिवस सोडून) **पी.एम.सी.** यांचेकडे सकाळी ११:०० ते सायंकाळी ६:०० दरम्यान व संस्था यांचेकडे सायंकाळी ६:०० ते सायंकाळी ८:०० दरम्यान खालील पत्यावर मिळू शकतील.
**८) निविदा कागदपत्राचे मुल्य** : **रुपये २०,०००/- (अक्षरी वीस हजार मात्र) डी.डी. किंवा पेऑर्डर स्वरुपात जमा करणे**
**९) निविदा दाखल करण्याचे ठिकाण** : संस्था व पी.एम.सी. यांचे कार्यालय (खालील वेळेनुसार)
**१०) प्री-बीड मिटींग** : दि. ०७/०६/२०२३ रोजी, पी.एम.सी. कार्यालय
**११) निविदा स्विकारणेचा शेवटचा दिनांक** : दिनांक १०/०६/२०२३ ते २०/०६/२०२३ चे दरम्यान (सुटीचे दिवस सोडून) पी.एम.सी. यांचेकडे सकाळी ११:०० ते सायंकाळी ६:०० दरम्यान व संस्था यांचेकडे सायंकाळी ६:०० ते सायंकाळी ८:०० वाजेपर्यंत, कोणत्याही निविदा स्विकारणेचा अथवा कोणत्याही कारणाशिवाय नाकारणेचा अधिकार संस्थेच्या मंडळांचा असेल.
**मो. क्र. (९८२०४८९९२०/८०९७६३५२३३/९२२४१८१४१२)**
**१२) संस्था कार्यालय** : **यशोमंगल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मालमत्ता क्र. ६३२, ६३३, ६३३/१, डॉ. पटवर्धन मार्ग, जुन्या पोस्टाजवळ, पनवेल. जि. रायगड, ४१०२०६**
**१३) पी.एम.सी. कार्यालय** : **ॲड. सचिन मा. कल्याणकर ॲण्ड असोसिएटस, पी.एम.सी., भुखंड क्र. १४२/अे, पहिला मजला, मिडलक्लास सोसायटी, युनियन बँकेच्यावर, सुरुची हॉटेल समोर, गांधी हॉस्पिटलच्या मागे, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६ मो.क्र.९७६८३६६७१४**

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २३/०५/२०२३**

**सही/-**
**सचिव अध्यक्ष**
**यशोमंगल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,**



### ग्रामपंचायत आकुर्ली
### ता. पनवेल, जि. रायगड

जा.क्र.४२/ ग्रा.प./आस्था २०२३
ग्रामपंचायत आकुर्ली
दि. २४/०५/२०२३

याव्दारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशीलाचे ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी नोंद वहीतील नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**(वाचा : मुंबई ग्रामपंचायत अधिनीयम ८ नियम ३२ (१))**

| अ.क्र. | भाग क्र. | स.नं, प्रॉ.नं./फा. प्लॉट/सदनिका/गाळा क्र. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/१४०५ | एकनाथ रघुनाथ भोपी | राजेश्री एकनाथ भोपी |
| २ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/१६०२ | दिपक शेंकरलाल गोलवाला, चेतना दिलीप गोलवाला, दिपेश दिलीप गोलवाला | मंजु राजकुमार भूनिया, राजकुमार रामपडो भूनिया |
| ३ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/G/१६०३ | रामकिशन ऐलामनचिली परिमला ऐलामनचिली | वरलक्ष्मी ऐलामांचिली |
| ४ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/ G/१६०३ | वरलक्ष्मी ऐलामांचिली | प्रणाली अमर सुर्वे अमर मनोहर सुर्वे |
| ५ | | ओमकार अँड रॉयल रेसिडन्सी आकुर्ली ३९६/B/२०१ | संदिप भास्कर कोपुल्ली | प्रविण विठ्ठल वारोसे मोहीणी प्रविण वारोसे |
| ६ | | ओम साई कॉम्पलेक्स आकुर्ली ४१२/००२ | आगा रियल्टी तर्फे ओम साई कॉम्पलेक्स तोसिफ जलालुद्दीन आगा | हेमंत सुरेश चाचे |
| ७ | | साई लिला आकुर्ली ३२१/०५ | सुचित्रा सुकुमार मंडळ | संदिप सुकुमार मंडळ प्रसेणजित सुकुमार मंडळ |
| ८ | | तुलसिविहार सोसायटी आकुर्ली १९४/A/१०३ | लक्ष्मीदेवी फुल सिंग | रिमा उत्तम निकाळजे |
| ९ | | मातेश्वरी डिझायर आकुर्ली ४०८/C३/१०४ | नेहा अभिजित बाबर | नेहा गोविंद चंदने |
| १० | | अपेक्षा कॉम्पलेक्स आकुर्ली २०७ब/ H/ १०३ | अर्जुन पांडुरंग मांगलेकर | वर्षा आकाश मरे |
| ११ | | मातेश्वरी कॉम्पलेक्स आकुर्ली ३०८/D/१०३ | अर्पणा अजित कचरेकर | मयुरी धनंजय वास्कर धनंजय चंद्रकांत वास्कर |
| १२ | | मातेश्वरी कॉम्पलेक्स आकुर्ली ३०८/F/०३ | विजय वैजु पाटील | अमित आदिनाथ बालुगडे |
| १३ | | पनवेल पॅराडाईज आकुर्ली ३६०/F/२०३ | स्नेहा ए कदम उर्फ स्नेहा नैनेश खैरे आनंद भागुराम कदम | शितल मनोज नारलावार |
| १४ | | अपेक्षा कॉम्पलेक्स आकुर्ली २०७ ब/I/०९ | अशोक. पी. डोळस | शशिकांत शंकर डंगारे संगिता शशिकांत डंगारे |

वरील बाबत प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्याच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असुन याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असल्यास सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासुन सात दिवसाचे आत ग्रामपंचायत आकुर्ली कार्यालयात लेखी स्वरूपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे बदल करणेत आल्यानंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरण मुंबई ग्रामपंचायत अधिनियम प्रकरण ८ नियम ३२ (१) नुसार कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**सौ. भारती सचिन पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत-आकुर्ली**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**श्री. जयेंद्र घनशाम म्हात्रे**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत-आकुर्ली**
**ता. पनवेल, जि. रायगड**

# चेन्नई फायनलमध्ये दाखल

## क्वालिफायर १ सामन्यात गुजरात पराभूत

**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्जने मंगळवारी झालेल्या क्वालिफायर १ सामन्यात गुजरात टायटन्सचा १५ धावांनी करीत १०व्यांदा आयपीएलच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना सीएसकेने ऋतुराज गायकवाडच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर २० षटकांत सात गडी गमावून १७२ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात गुजरातला सर्वबाद १५७ धावाच करता आल्या.

गुजरातकडून सलामीवीर शुबमन गिलने सर्वाधिक ३८ चेंडूत ४२ धावा केल्या. त्याने आपल्या खेळीत चार चौकार आणि एक षटकार लगावला. याशिवाय गुजरातचा कर्णधार हार्दिक पांड्यासह उर्वरित फलंदाजांनी निराशा केली, परंतु राशिद खानने शेवटच्या षटकांमध्ये १६ चेंडूंत ३० धावांची झटपट खेळी केली, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. चेन्नईकडून गोलंदाजी करताना दीपक चहरव्यतिरिक्त महिश तिक्ष्णा, रवींद्र जडेजा आणि महिषा पथिराना यांनी प्रत्येकी विकेट घेतल्या, तर तुषार देशपांडेला एक विकेट मिळाली.



तत्पूर्वी सीएसकेने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत सात गडी गमावून १७२ धावा केल्या होत्या. सीएसकेकडून ऋतुराज गायकवाडने सर्वाधिक ६० धावांची खेळी केली. डेव्हॉन कॉनवेने ४० धावांचे योगदान दिले. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी केली. रवींद्र जडेजाने १६ चेंडूंत २२ धावा केल्या. अजिंक्य रहाणे आणि अंबाती रायडू यांनी प्रत्येकी १७ धावा केल्या. चेन्नईचा कर्णधार महेंद्रसिंह धोनी आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी एक धाव काढली. चार चेंडूंत नऊ धावा काढून मोईन अली नाबाद राहिला.

### *'हार्दिकसेने'ला आणखी एक संधी*

*धोनीच्या नेतृत्वाखाली संघ आता २८ मे रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पाचव्यांदा चॅम्पियन बनण्यासाठी उतरेल. दुसरीकडे या पराभवानंतर गुजरात संघाला फायनलमध्ये पोहचण्यासाठी अजून एक संधी आहे. गुजरात २६ मे रोजी अहमदाबाद येथे क्वालिफायर २मध्ये खेळणार आहे. तिथे तो मुंबई इंडियन्स किंवा लखनऊ सुपर जायंट्सशी सामना करेल. मुंबई आणि लखनऊ यांच्यात एलिमिनेटर सामना खेळवला जाऊन या सामन्यातील विजयी संघ क्वालिफायर-२मध्ये जाईल. मग २८ मे रोजी अंतिम लढत रंगेल.*

गुजरातकडून मोहम्मद शमी आणि मोहित शर्माने प्रत्येकी दोन गडी बाद केले. दर्शन नळकांडे, नूर अहमद आणि राशिद खान यांना प्रत्येकी एक यश मिळाले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून शेन वॉर्नच्या आठवणींना उजाळा

## सिडनीत संवादादरम्यान जिंकली मने

**सिडनी : वृत्तसंस्था**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑस्ट्रेलियात दौऱ्यात तेथे राहणाऱ्या भारतीयांची भेट घेतली. एरिना स्टेडियमवर हजारो लोकांसमोर पंतप्रधान मोदी दोन्ही देशांमधील संबंधांवर खुलेपणाने बोलले. दिवंगत महान क्रिकेटपटू शेन वॉर्नबद्दल बोलताना त्यांनी भारतीय लोक एखाद्या प्रिय व्यक्तीला गमावल्यासारखे शोक करीत असल्याचे म्हटले.

खेळांमधील नातेसंबंधाबद्दल बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आमच्या क्रिकेटच्या नात्यालाही ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत. क्रिकेटच्या मैदानावरील स्पर्धा जितकी रंजक असते, तितकीच मैदानाबाहेरची आमची मैत्री अधिक घट्ट असते. या वेळी ऑस्ट्रेलियातील अनेक महिला क्रिकेटपटूही पहिल्यांदाच आयपीएल खेळण्यासाठी भारतात आल्या होत्या. प्रथमच महिला आयपीएल प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये मेग लॅनिंग, एलिस पेरी आणि ॲलिसा हिली यांच्यासह अनेक क्रिकेटपटूंनी भाग घेतला.

शेन वॉर्नची आठवण करून देताना पंतप्रधान मोदी म्हणाले, असे नाही की आपण फक्त आनंदाचे साथीदार आहोत. चांगला मित्र नेहमी सुखात आणि दु:खात सोबती असतो. गेल्या वर्षी महान शेन वॉर्नचे निधन झाले तेव्हा ऑस्ट्रेलियासह कोट्यवधी भारतीयांनी शोक व्यक्त केला होता. जणू आपण कोणीतरी गमावले होते. ४ मार्च २०२२ रोजी वॉर्नचा अचानक मृत्यू झाला. शेन वॉर्न आयपीएलच्या पहिल्या सत्राचा विजेता राजस्थान रॉयल्सचा कर्णधार होता.

---

कुमार-मुली ज्युनिअर गट खो खो स्पर्धा

# विद्यार्थी वि. वैभव, ओम साईश्वर वि. ओम समर्थ उपांत्य फेरीत लढणार



**मुंबई : प्रतिनिधी**

कुमारांच्या पहिल्या सामन्यात माहिमच्या ओम समर्थ व्यायाम मंदिरने दादरच्या श्री समर्थ व्यायाम मंदिरचा ९-४ (९-२, २) असा एक डाव पाच गुणांनी पराभव केला. ओम समर्थच्या श्रेयस सौदळकरने नाबाद ३.२०, ४.३० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात एक गडी बाद केला. साई गुरवने २.५०, ३ मिनिटे संरक्षण केले. स्वयंम साळवीने २.५० मिनिटे संरक्षण करुन आक्रमणात दोन गडी बाद केले. पराभूत श्री समर्थच्या साईश शिंदेने १.२० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात दोन गडी बाद केले. अथर्व खोचडेने २.१० मिनिटे संरक्षण केले.

दुसऱ्या सामन्यात परळच्या विद्यार्थी क्रीडा केंद्राने माहिमच्या सरस्वती स्पोर्ट्स क्लबचा १३-०८ (१३-३, ५) असा एक डाव पाच गुणांनी पराभव केला. विद्यार्थीच्या भावेश बनेने नाबाद १, १ मिनिटे संरक्षण करून पाच गडी बाद केले. जनार्दन सावंतने ६.३० मिनिटे संरक्षण करुन आक्रमणात तीन गडी बाद केले. सुबोध पाटीलने १.२०, २.४० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात तीन गडी बाद केले, तर पराभूत सरस्वतीच्या १.४०, १.३० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात तीन गडी बाद केले. प्रतीक इंदुलकरने १.५० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात दोन गडी बाद केले.

तिसऱ्या सामन्यात लालबागच्या यजमान ओम साईश्वर सेवा मंडळाने परळच्या युवक क्रीडा मंडळाचा ११-१० (०६-०४, ०५-०६) असा ३.४० मिनिटे राखून एक गुणाने पराभव केला. ओम साईश्वरच्या नितेश अष्टमकरने १.५०, २.५० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात तीन गडी बाद केले. निषाद ताम्हणेकरने २, १.४० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात एक गडी बाद केला. यज्ञेश तुळसकरने १:२० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात दोन गडी बाद केले. युवकाच्या अमित पालने २, १.५० मिनिटे संरक्षण करुन आक्रमणात एक गडी बाद केला, साहिल रानमाळेने १:२० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात दोन गडी बाद केले.

चौथ्या सामन्यात दादरच्या वैभव स्पोर्ट्स क्लबने दादारच्याच अमर हिंद मंडळाचा २३-७ (११-०६, १२-०१) २३-०७ असा १६ गुणांनी धुव्वा उडवला. वैभवच्या हार्दिक मोहितेने ३.१० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात चार गडी बाद केले. ओमकार सातपुतेने १.३० मिनिटे संरक्षण करुन आक्रमणात सहा गडी बाद केले. वेदांत नागवेकरने २.५० मिनिटे संरक्षण करुन आक्रमणात तीन गडी बाद केले. अमर हिंदतर्फे गौरव कुडवने १ मिनिटे संरक्षण करून आक्रमणात चार गडी बाद केले. विघ्नेश कोरेने १, १.१०, २.०० मिनिटे संरक्षण करुन आक्रमणात एक गडी बाद केला.

मुलींच्या उपांत्य फेरीत ओम साईश्वर सेवा मंडळ विरुद्ध श्री समर्थ व्यायाममंदिर व आर्यसेना विरुद्ध वैभव स्पोर्ट्स क्लब असे सामने होतील.

# ज्युनिअर पनवेल प्रीमियर लीगमध्ये एफएससीसी, रॉकविला फायटर्स विजयी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मिडलक्लास सोसायटीच्या मैदानावर सुरू असलेल्या टीआयपीएल ज्युनिअर पनवेल प्रीमियर लीगच्या दुसऱ्या दिवशी फ्युचर स्टार क्रिकेट क्लिनिक (एफएससीसी) आणि रॉकविला फायटर्स या संघांनी विजयाची नोंद केली.

पहिला सामना एफएससीसी विरुद्ध प्रतीक क्रिकेट अकॅडमी (पीसीए) असा झाला. यामध्ये पीसीएने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्रक्षण स्वीकारले. एफएससीसी संघाने फलंदाजी करीत १५५ धावा केल्या. या संघाकडून शिवराज जगतापने ५१ धावा काढल्या, तर पीसीए संघाकडून अर्णव साळवीने तीन गडी बाद केले. १५५ धावांचा पाठलाग करताना पीसीए फक्त १२३ धावा करू शकले. एफएससीसी संघाकडून आकाश सेठीने तीन षटकांमध्ये अवघ्या नऊ धावा देत दोन गडी बाद केले.

दुपारच्या सत्रातील सामन्यात मॉर्निंग पंटर्सने प्रतिस्पर्धी रॉकविला फायटर्स संघाविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण निवडले होते. फलंदाजी करताना रॉकविला फायटर्स संघाने १९१ धावा केल्या. या संघाकडून स्वराज गोवारीने ३९ धावांची खेळी केली. आव्हानाचा पाठलाग करताना मॉर्निंग पंटर्स १८४ धावांपर्यंतच मजल मारू शकले. या संघाकडून यश पुंडेने ५४ आणि सक्षम सिंहने ४९ धावांचे योगदान दिले.

# विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत गनीमत, दर्शनाला पदक

**अल्माटी : वृत्तसंस्था**

विश्वचषक नेमबाजी स्पर्धेतील स्कीट प्रकारात भारताच्या गनीमत सेखों आणि दर्शना राठोड यांनी अनुक्रमे रौप्य व कांस्यपदकाची कमाई केली. विश्वचषकातील स्कीट प्रकारात भारताच्या दोन महिला नेमबाजांनी पदके मिळवण्याची ही पहिलीच वेळ ठरली.

कझाकस्तानच्या एसेम ओरिनबेने 'शूट-ऑफ'मध्ये गनीमतला पराभूत करीत सुवर्णपदक मिळवले. गनीमत व ओरिनबेने ६० फैऱ्यांच्या अंतिम फेरीत ५०-५० गुण मिळवले होते. बरोबरीची कोंडी फोडण्यासाठी झालेल्या 'शूट-ऑफ'मध्ये गनीमत दोनपैकी एका लक्ष्याचा वेध घेण्यापासून चुकली, तर, ओरिनबेने दोन्ही वेळा लक्ष्य अचूक वेधले. त्यामुळे गनीमतला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. विश्वचषकात तिचे हे दुसरे वैयक्तिक पदक ठरले.

दर्शनाने वरिष्ठ स्तरावरील प्रथमच अंतिम फेरी गाठताना पदक निश्चित केले. त्यापूर्वी स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी दर्शनाने १२० गुणांसह राष्ट्रीय विक्रमाची बरोबरी करीत सहा महिलांच्या अंतिम फेरीसाठी दुसऱ्या स्थानासह पात्रता मिळवली होती.

# ऋतुराजने टाकले विराटला मागे



**मुंबई : प्रतिनिधी**

चेन्नई सुपर किंग्जने आयपीएलमधील पहिल्या क्वालिफायर सामन्यात गुजरात टायटन्सवर विजय मिळवला. सीएसकेकडून ऋतुराज गायकवाडने शानदार अर्धशतकी (४४ चेंडूंत ६० धावा) खेळी केली. या खेळीनंतर गायकवाडने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विराट कोहलीचा एक खास विक्रम मोडला.

गुजरात आणि चेन्नई यांच्यात आतापर्यंत चार सामने झाले असून सर्व सामन्यांमध्ये ऋतुराज गायकवाडने अर्धशतक झळकावले आहे. त्याने गुजरातविरुद्ध चार डावांत ६९.५च्या सरासरीने आणि १४५.५च्या स्ट्राईक रेटने २७८ धावा केल्या आहेत, तर विराट कोहलीने गुजरातविरुद्ध तीन डावांत ११६च्या सरासरीने आणि १३८.१च्या स्ट्राईक रेटने २३२ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने एक शतक आणि दोन अर्धशतके झळकावली आहेत.

ऋतुराजने गुजरातविरुद्ध विराटपेक्षा जास्त धावा केल्या आहेत. आयपीएल २०२३चा पहिला लीग सामना गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात खेळला गेला, ज्यामध्ये गुजरातने पाच विकेट्सने विजय मिळवला, मात्र या सामन्यात चेन्नईचा सलामीवीर गायकवाडने ९२ धावांची खेळी करत सर्वांची मने जिंकली होती. गायकवाडने आतापर्यंत गुजरातविरुद्ध चार सामन्यांत ७३(४८), ५३(४९), ९२(५०) आणि ६०(४४) धावा केल्या आहेत.

---

# आरसीबी प्ले ऑफच्या शर्यतीतून बाहेर पडल्याने गेलला अश्रू अनावर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलचा १६वा हंगाम अंतिम टप्प्यात आला आहे. चार वेळा चॅम्पियन असलेल्या चेन्नई सुपर किंग्जने अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे, तर दुसऱ्या तीन संघांमध्ये अंतिम फेरीसाठी लढत आहे. अशा परिस्थितीत स्पर्धेतून बाहेर पडलेल्या संघांचे चाहते अजूनही निराशेच्या सागरात बुडालेले आहेत. त्यापैकीच एक म्हणजे आरसीबीचा माजी खेळाडू ख्रिस गेल.

आयपीएलच्या चालू हंगामात चांगली कामगिरी करूनही आरसीबी संघ प्ले ऑफमध्ये पोहोचू शकला नाही. प्रत्येक वेळीप्रमाणे या वेळीही संघाला चॅम्पियन बनवण्याची चाहत्यांची इच्छा अपूर्णच राहिली. आरसीबीचा माजी खेळाडू ख्रिस गेलही आरसीबी प्लेऑफमधून बाहेर पडल्याने खूप दु:खी आहे. त्याची एक रील सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे, ज्यामध्ये गेल आरसीबी बाहेर पडल्याने



दु:ख व्यक्त करताना दिसत आहे.

दीपराज जाधव या नावाच्या हँडलवरून हे व्हायरल रील्स इन्स्टाग्रामवर पोस्ट केली आहे. रीलमध्ये ख्रिस गेल 'मुन्नाभाई एमबीबीएस' चित्रपटातील एका गाण्यावर अभिनय करताना दिसत आहे. आरसीबीच्या शेवटच्या सामन्यावर रीलची थीम आहे. शेवटच्या सामन्यात आरसीबीला गुजरात टायटन्सकडून सहा विकेटने पराभव पत्करावा लागला होता. या पराभवानंतर आरसीबी स्पर्धेतून बाहेर पडला. जर आरसीबीने हा सामना जिंकला असता, तर त्याची प्ले ऑफमध्ये जाण्याची शक्यता खूप जास्त होती. त्यानंतर मुंबई इंडियन्स आणि त्याच्यातील नेट रनरेटने प्ले ऑफचा मार्ग निश्चित केला असता.

ख्रिस गेललाही आरसीबी बाहेर जाण्याचे दु:ख आहे, कारण गेलने आरसीबीसोबत बराच काळ घालवला आहे. आयपीएलमध्ये १४२ सामने खेळणारा ख्रिस गेल २०११ ते २०१७ या कालावधीत आरसीबीकडून खेळला. आयपीएलमध्ये जेव्हा जेव्हा स्फोटक खेळाडूंचा उल्लेख होतो, तेव्हा गेलचे नाव नक्कीच येते. गेलने आयपीएलमध्ये सुमारे ४०च्या सरासरीने आणि सुमारे १५०च्या स्ट्राइक रेटने ४९६५ धावा केल्या आहेत.

# विंडीजच्या खेळाडूवर मॅच फिक्सिंगचा गंभीर आरोप

**पोर्ट ऑफ स्पेन : वृत्तसंस्था**

गेल्या काही वर्षांत वेस्ट इंडिज क्रिकेट संघाची अवस्था बिकट झाली आहे. दोन वेळा टी-२० विश्वविजेत्याला आता या स्पर्धेची क्वालिफायर फेरी खेळावी लागत आहे. दरम्यान, संघाला आता आणखी एक मोठा डाग लागला आहे. वेस्ट इंडिजचा खेळाडू डेव्हॉन थॉमस (३३) याच्यावर भ्रष्टाचारविरोधी संहिता मोडल्याचा आरोप आहे. येत्या १४ दिवसांत आयसीसीने खेळाडूकडून उत्तर मागवण्यात आले आहे.

डेव्हॉनवर फिक्सिंगचे गंभीर आरोप आहेत. या खेळाडूवर श्रीलंका प्रीमियर लीग, अबू धाबी टी-१० आणि कॅरेबियन प्रीमियर लीगमध्ये मॅच फिक्सिंगचा आरोप आहे. त्यामुळे आता श्रीलंका प्रीमियर लीग, क्रिकेट वेस्ट इंडिज



आणि एमिरेट्स बोर्डाला त्यांच्या स्तरावर चौकशी करण्यास सांगितले आहे. क्रिकेट वेस्ट इंडिजने तपासात पूर्ण सहकार्य करण्याचा निर्णय घेतला आहे.

डेव्हॉनवर मॅच फिक्सिंगच्या आरोपासह श्रीलंका भ्रष्टाचारविरोधी संहितेचे उल्लंघन केल्याबद्दल चार आरोपांचा समावेश आहे. २०२१मध्ये, लंका प्रीमियर लीगमध्ये कँडी वॉरियर्सकडून खेळताना थॉमसने सामना फिक्स करण्याचा प्रयत्न केला. यासोबतच फिक्सिंगची माहिती बोर्डाला न दिल्याचा आरोपही त्याच्यावर करण्यात आला. अबुधाबी टी-२०मध्ये पुणे डेव्हिल्सकडून खेळताना त्याला फिक्सिंगची ऑफर आली होती, पण त्याने याची माहिती दिली नव्हती.

थॉमसने २०२२ साली वेस्ट इंडिजकडून शेवटचा सामना डिसेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळला होता. त्याच्या कारकिर्दीतील हा एकमेव कसोटी सामना होता. त्याने आतापर्यंत २१ एकदिवसीय आणि १२ टी-२० सामने खेळले आहेत. त्याची नुकतीच आयर्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी निवड झाली आहे, मात्र आताची परिस्थिती पाहता त्याला संधी मिळेल, असे वाटत नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com